आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर
www.dainiklaturprabhat.in





# दैनिक लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com

मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,

RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ८ वे ● अंक १२३ वा ● मंगळवार दि. ०८ ऑक्टोबर २०२४ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●


## दयानंद विज्ञान महाविद्यालयात नवरात्रीनिमित्त दांडिया उत्सव

लातूर : दुर्गा देवतेच्या पूजेचा व मानसन्मानाचा उत्सव म्हणून नवरात्रोत्सव संपूर्ण महाराष्ट्रात मोठ्या थाटामाटात व भव्यपणे साजरा केला जातो आहे.याच पार्श्र्वभूमीवर दि.५ ऑक्टोबर २०२४ वार शनिवार रोजी दयानंद विज्ञान महाविद्यालयातील युवती कल्याण मंडळातर्फे कला महाविद्यालयातील प्रागंणामध्ये पदवी,पदव्युत्तर विद्यार्थीनी तसेच महिला कर्मचाऱ्यांच्यासाठी दांडिया उत्सवाचे आयोजन करण्यात आलेले होते. सदरील दांडिया उत्सवा दरम्यान दांडिया स्पर्धा घेण्यात आली.यामध्ये सर्वोत्कृष्ट दांडिया परफॉर्मन्स म्हणून जाधव गौरवी,बेस्ट कपल म्हणून ऐश्र्वर्या शितोळे,नंदिनी आंबेसंगे तर बेस्ट ग्रुप म्हणून बावगे अपर्णा,खलंग्रे अंकिता,भोसले सुजाता,पवार प्रतिक्षा,देशमुख वैष्णवी यांची निवड करण्यात आली. स्पर्धेचे बक्षीस वितरण महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.सिद्धेश्र्वर बेल्लाळे,व रविकिरण सर यांच्या हस्ते करण्यात आले.

## माजी सैनिक मुलांच्या वसतिगृह येथे निवासी अशासकीय अधिक्षक पदासाठी मुलाखती

लातूर, (जिमाका) :- जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय यांच्या आस्थापनेवरील माजी सैनिक मुलांचे वसतिगृह येथे निवासी अशासकीय वसतिगृह अधीक्षक पद तात्पुरत्या स्वरुपात एकत्रित मानधन प्रतिमहा रक्कम रुपये ३१ हजार ८७५ प्रमाणे भरण्यात येणार आहे. यासाठी इच्छूक माजी सैनिक (फक्त जेसीओ) उमेदवारांनी आपल्या अर्ज व सर्व मुळ कागदपत्रासह मुलाखतीसाठी दिनांक ११ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, लातूर येथे स्वत: उपस्थित रहावे. निवड करण्यात आलेल्या उमेदवारास तात्काळ कामावर घेण्यात येणार आहे, असे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद पांढरे (नि) यांनी कळविले आहे.

## 'नाफेड'मार्फत मूग,उडीद व सोयाबीन खरेदीसाठी नोंदणी सुरु

लातूर (जिमाका) :- महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ व नाफेड आणि एनसीसीएफ यांच्या संयुक्त विद्यमाने हंगाम २०२४-२०२५ मध्ये राज्यात केंद्र शासनाने निश्र्चित केलेल्या आधारभूत दरानुसार मूग, उडीद व सोयाबीन खरेदी केली जाणार आहे. यासाठी शेतकरी नोंदणी १ ऑक्टोबर, २०२४ पासून सुरु करण्यात आली असून प्रत्यक्षात मूग,उडिद खरेदी दिनांक १० ऑक्टोबर, २०२४ आणि सोयाबीन खरेदी १५ ऑक्टोबर, २०२४ पासून सुरु करण्यात येणार आहे.

केंद्रीय नोडल एजेन्सी नाफेडमार्फत अकोला, अमरावती, बीड, बुलडाणा, धाराशिव, धुळे, जळगाव, जालना, कोल्हापूर, लातूर, नागपूर, नंदूरबार, परभणी, पुणे, सांगली, सातारा, वर्धा, वाशिम व यवतमाळ या जिल्ह्यात खरेदी केली जाणार आहे.

नाफेड कार्यालयाने १९ जिल्ह्यातील १४६ खरेदी केंद्राना मंजूरी दिली आहे. त्यानुसार लातूर जिल्ह्यात लातूर येथील जागृती प्रगती बीजो-उत्पादन प्रक्रिया पणन सहकारी संस्था, लातूर तालुक्यतील सेलू येथील जिजामाता मिरची प्रक्रिया पणन सहकारी संस्था, औसा येथील औसा तालुका सहकारी खरेदी विक्री -विक्री संघ, रेणापूर रेणुका शेतकरी सहाकरी खरेदी -विक्री संघ, चाकूर येथील चाकूर तालुका सहकारी खरेदी -विक्री संघ, चाकूर तालुक्यातील आष्टा येथील शेषाद्री कृषी वस्तू पुरवठा सहकारी संस्था, उदगीर येथील स्व. रावचंद्रराव पाटील तळेगावकर तालुका सहकारी खरेदी -विक्री संघ, देवणी येथील तालुका सहकारी खरेदी विक्री संघ, अहमदपूर येथील विविध कार्यकारी सहकारी सोसायटी, निलंगा तालुक्यातील हालसी (तु) येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी, उदगीर तालुक्यातील लोणी येथील रंगराव पाटील कृषी उत्पन्न (खाजगी) बाजार समिती, अहमदपूर तालुक्यातील साताळा येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी, शिरुर ताजबंद येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसयटी, जळकोट तालुक्यातील कुणकी येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसयटी या खरेदी केंद्राना मंजुरी देण्यात आली आहे.

सर्व शेतकरी बांधवांनी केंद्र शासनाने निश्र्चित केलेल्या आधारभूत दरानुसार मूग, उडिद व सोयाबीन खरेदी योजनेचा लाभा घ्यावा. शेतकऱ्यांनी गावाजवळील नाफेड खरेदी केंद्रावर जावून सातबारा उतारा, आधारकार्ड व बँकेचे पासबुक घेवून प्रथम आपल्या पिकाची नोंदणी करुन घ्यावी. एसएमएस प्राप्त झाल्यानंतर शेतमाल विक्रीसाठी खरेदी केंद्रावर घेवून यावा. जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन पणन महासंघाचे उपाध्यक्ष दत्तात्रय भाऊसाहेब पानसरे, रोहीत दिलीप निकम, सर्व संचालक मंडळ, व्यवस्थापकीय संचालक श्रीधर बी. डुबे-पाटील व सर व्यवस्थापक देविदास भोकरे यांनी केले आहे.

## कोणाच्या पराभवासाठी नव्हे, तर इतिहास निर्माण करण्यासाठी विधानसभा निवडणूक भाजपा तर्फे लढविणारच ! डॉ. अर्चना पाटील चाकूरकर यांचा संदेश !



लातूर : राजकारण, सत्ताकारण करणे ही माझी हौस नाही, माझे पितामह सासरे शिवराज पाटील चाकूरकर हे कॉग्रेसचे निष्ठावंत आहेत. केंद्रीय मंत्री राज्यपाल, लोकसभा अध्यक्ष, इथपर्यंत त्यांनी सत्ताकारण केलेले आहे. त्यासाठी ते देवघरातील माझे देव असले तरी मी माझा स्वतः चा इतिहास घडविण्यासाठी कोणाच्या पराभवासाठी नव्हे, विधानसभा निवडणूक मी लढविणारच अशी ग्वाही अर्चना पाटील चाकूरकर यांनी पत्रकारांशी संवाद साधताना दिला.

अनेक पत्रकारांनी त्यांच्याशी संवाद साधताना शिवराज पाटील चाकूरकर यांच्या संदर्भात मत विचारण्याचा प्रयत्न केला असता, त्या विषयाला बगल देवून मी भाजपात प्रवेश केलेला आहे, पक्ष श्रेष्ठी मला उमेदवारी देतीलच ही खात्री असल्यामूळे भाजपाच्या तिकीटावर कोणाच्या पराभवासाठी नव्हे तर माझा मी इतिहास निर्माण करावा यासाठी विधानसभा निवडणूक लढवून मी विजयी होणार आणि लोकसेवा करणार यांचा मला आत्मविश्वास असल्यामूळे मी देवघरातील देवाची पर्वा न करता राजकारणात उतरली आहे, त्यामूळे दुसरा कोणता विकल्प न ठेवता यापुढे मी राजकारण करणार असल्यामूळे लातूरातील स्थानीक नेत्यापेक्षा वरीष्ठांच्या आदेशानुसार आजघडील कार्यरत असल्याचे नमूद करुन विधानसभा मतदार संघात भाजपावतीने अनेकजन इच्छूक असले तरी अधिकृत उमेदवार म्हणून मलाही न्याय मिळेल अशी ही खात्री डॉ. अर्चना पाटील चाकूरकर यांनी दिली.

यावेळी पुरस्कार प्राप्त जेष्ठ पत्रकार प्रदिप नणंदकर, जयप्रकाश दगडे यांचा सत्कार अर्चना पाटील यांनी केला. स्नेहमिलन, स्नेहभोजन कार्यक्रम सर्व पत्रकारांची भेट घेणे व चर्चा करणे हाच उद्देश असल्याचं स्पष्ट करुन तूम्हाला माझ्याकडून काय नको, मला तूमच्याकडून काय नको, कांही दिवसापूर्वी मुंबईत भाजपा पक्षात प्रवेश घेतला आहे. प्रसिध्दी मिळाली पाहीजे या, ना त्या कारणाने भेट घ्यावी, यासाठी स्नेहमिलन व स्नेहभोजनाचा कार्यक्रम ठेवला आहे. ९०% पत्रकारांच्या भेटी आज झाल्या, कमी टिका अधिक मार्गदर्शन व्हावे हाच उद्देश. भाजपात प्रवेश घेतलात, शिवराज पाटील चाकूरकर साहेबाना काय वाटते, पूढे काय करणार वगैरे कांही पत्रकार प्रश्न विचारतात, पडद्या मागून प्रथमच समोर आले आहे, चौकट ओलांडून येत असताना चाकूरकर साहेबाचा आर्शिवाद, परवाणगी घेवूनच मी बाहेर आली आहे, राजकारणाचा श्रीगणेशा भारतीय जनता पक्षात प्रवेश घेवून केला आहे. भाजपाकडे अधिकृत उमेदवारी मिळावी महणून मी मागणी केली आहे. डॉ. अर्चना पाटील यांचा झेंडा उभा करण्यासाठी आली आहे, मी कोणाची माती करण्यासाठी नाही, पत्रकारांच्या अशा अनेक प्रश्नाचे उत्तरे हासत देवून सर्वांची मने जिंकली.

त्यामूळे महाविकास आघाडीचे उमेदवार अमित देशमूख असतील की, दुसरा कोणी उमेदवार पुढे येणार अशीच कुजबूज राजकीय वर्तूळात होताना दिसते आहे.

## अतिवृष्टीने शेती पिकाचे मोठे नुकसान; आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून लातूर ग्रामीण मधील ७१ हजार शेतकऱ्यांना १०३ कोटी ५५ लाखांची मदत जाहीर

लातूर - गेल्या ऑगस्ट आणि सप्टेंबर २०२४ या कालावधीत अतिवृष्टी आणि पूर यामुळे शेती पिकाचे मोठे नुकसान झाल्याने राज्यातील महायुती शासनाने लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील ७१ हजार ६६६ नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून १०३ कोटी ५५ लाखांची मदत जाहीर जाहीर झाली आहे. दरवर्षीपेक्षा यावर्षी समाधानकारक पाऊस होत असतानाच अनेक भागात अतिवृष्टी झाली नद्या नाल्यांना पूर आल्याने बहुसंख्य शेतकऱ्याचे मोठ्या प्रमाणात शेतीच्या पिकाचे नुकसान झाले. प्रत्येक वर्षी कुठल्या ना कुठल्या नैसर्गिक आपत्तीला शेतकऱ्यांना तोंड द्यावे लागत आहे. शेतकऱ्यांच्या हिताची जपणूक करणाऱ्या राज्यातील महायुती शासनाचे मुख्यमंत्री मा. एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस हे ४ सप्टेंबर २०२४ रोजी लातूर जिल्हा दौऱ्यावर आले असता अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या पिकांची पाहणी केली होती. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांना भरीव मदत करण्याची ग्वाही दिली होती. लातूर ग्रामीण मतदार संघातील अनेक शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी नुकसानीत आलेल्या पिकाची पाहणी करून मदत मिळवून देण्याचा दिलासा दिला होता त्यानुसार राज्याचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, कृषी मंत्री धनंजयजी मुंडे, जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीशजी महाजन यांच्याकडे आ. रमेशआप्पा कराड यांनी पाठपुरावा करून शेतकऱ्यांना मदत द्यावी अशी आग्रहाची मागणी केली होती. राज्यातील महायुती शासनाने अतिवृष्टी आणि पुरामुळे नुकसानीत आलेल्या **(पान ३ वर)** ...

## श्री केशवराज मंदिर भक्तनिवास पुनर्बांधणी व विस्तारीकरणाचे काम सर्वात उत्कृष्ट आणि भव्य - दिव्य होईल : दिलीपराव देशमुख






लातूर : जुन्या लातूर भागातीलच नव्हे तर संपूर्ण लातूरवासियांचे श्रद्धास्थान असणाऱ्या स्वयंभू श्री केशवराज मंदिरच्या भक्तनिवास पुनर्बांधणी व विस्तारीकरणाचे काम लातूरमधील सर्वात उत्कृष्ट आणि भव्य - दिव्य स्वरूपाचे होईल, असा विश्र्वास माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी व्यक्त केला आहे.

सोमवारी सकाळी लातूर शहरातील पुरातन व स्वयंभू श्री केशवराज मंदिरच्या भक्तनिवास पुनर्बांधणी व विस्तारीकरण कामाचा भूमिपूजन समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. त्यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून माजी मंत्री दिलीपराव देशमुख बोलत होते. या कार्यक्रमाचा शुभारंभ यज्ञमार्तंड प.पू. यज्ञेश्र्वर रंगनाथ महाराज सेलूकर यांच्या हस्ते तर उदघाटन माजी मंत्री अमित देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मंचावर लातूर ग्रामीणचे आमदार धीरज देशमुख, लातूर मनपाचे आयुक्त बाबासाहेब मनोहरे , श्री केशवराज मंदिरचे अध्यक्ष एड. संजय पांडे, उपाध्यक्ष बजरंगलाल रांदड, सचिव अशोकराव गोविंदपूरकर आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

यावेळी आपल्या मार्गदर्शनात दिलीपराव देशमुख यांनी माणूस धार्मिक असावा, धर्मनिष्ठ असावा, पण धर्मांध नसावा असे सांगितले. आपला हिंदू धर्म सनातन आहे. या धर्माचा कोणी संस्थापक नाही. हिंदू धर्मातही त्याग, क्षमा, करुणा आहे. या सगळ्या गोष्टींचे जतन करणे हे या धर्माचे सर्वात मोठे यश आहे. तसेच या धर्माच्या शिकवणीप्रमाणे कोणीही १०० टक्के वागू शकत नाही, हे आपल्या धर्माचे अपयश असल्याचे त्यांनी नमूद केले. हा राजकीय नव्हे तर सांस्कृतिक कार्यक्रम आहे. श्री केशवराज मंदिराला एक प्राचीन इतिहास आहे. या मंदिराच्या माध्यमातून विविध सामाजिक जबाबदाऱ्याही पूर्ण केल्या जातात, ही अतिशय महत्वाची बाब आहे. माजी मंत्री आ. अमित देशमुख यांच्याकडे पुरातत्व खात्याच्या मंत्रिपदाची जबाबदारी असताना त्यांनी या मंदिराच्या विकासासाठी अडीच कोटींचा निधी मंजूर केला होता. त्या कामाचा शुभारंभ आज झाल्याचे त्यांनी सांगितले. भक्तनिवास पुनर्बांधणी व विस्तारीकरणाच्या या कामासोबतच मंदिराच्या बाजूच्या मोकळ्या जागेच्या विकास कामाचाही प्लॅन करावा. ते कामही पूर्ण करण्यासाठी आपण सर्वतोपरी सहकार्य करू असे दिलीपराव देशमुख यांनी स्पष्ट केले.

लातूरच्या राजकीय क्षेत्रात वावरताना आपण राजकीय संस्कृती जपलीय . प्रत्येकाने आपण ज्या क्षेत्रात काम करतो, त्या क्षेत्राच्या संस्कृतीचे, त्याच्या धर्माचे पालन करणे आवश्यक असते, असे सांगून त्यांनी यावेळी सुसंस्कृतपणा, नैतिकता, भ्रष्टाचार म्हणजे भ्रष्ट आचरण यावर अत्यंत मौलिक विचार व्यक्त केले. आ. अमित देशमुख यांनी आपले विचार व्यक्त करताना श्री केशवराज मंदिराच्या या विकास कामासाठी आपण अडीच कोटी रुपयांचा जो निधी मंजूर केला आहे, तो निधी या विकास कामाचा पहिला हप्ता समजा, यापुढील काळात आपल्या विचाराचे सरकार आल्यास मंदिराच्या सर्वच विकास कामांसाठी आवश्यक तेवढा निधी उपलब्ध करून देण्यास आपण कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. आज समाजकारणात, धर्मकांडातही भ्रष्टाचार होताना दिसतोय हे सांगताना त्यांनी तिरुपतीच्या लाडू प्रकरणाचा विषय उपस्थित केला. राज्यातील विद्यमान सरकारचा पायाच भ्रष्टाचार आहे. अशा भ्रष्ट सरकारला जनता कंटाळली आहे. त्यामुळे येणाऱ्या निवडणुकीनंतर राज्यात महाविकास आघाडीचे सरकार सत्तारूढ होईल,असा विश्र्वासही आ. अमित देशमुख यांनी व्यक्त केला. मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी आपले विचार व्यक्त करताना मंदिराच्या विकास कामासाठी लागणाऱ्या आवश्यक त्या तांत्रिक आणि प्रशासकीय कामांसाठी आपण तत्पर असल्याचे सांगितले. मंदिराचे अध्यक्ष एड. संजय पांडे यांनी या मंदिराच्या गाभाऱ्याची उभारणी १२ व्या शतकात झाली असून अशा प्रकारच्या सामाजिक कार्याला राजाश्रयाची नितांत आवश्यकता असते असे सांगितले. या मंदिराच्या विकास कार्याबरोबरच देशपांडे गल्लीत असणाऱ्या सूर्य मंदिराचे अर्धवट कामही पूर्ण करण्यासाठी सहकार्याचे आवाहन केले.

मंदिराचे सचिव अशोक गोविंदपूरकर यांनी आपल्या प्रास्तविकात मंदिराच्या संपूर्ण कार्याचा आढावा संक्षिप्त स्वरूपात विशद केला. या मंदिराचे माहात्म्य विशद करताना त्यांनी सन १९९९ साली पहाटे साडेपाच वाजता दिवंगत लोकनेते विलासराव देशमुख मंदिरात अभिषेकला आले होते. अभिषेक करून ते प्रसाद घेऊन गेले आणि राज्याच्या मुख्यमंत्रीपदी विराजमान झाले. तर आपण २०१२ च्या मनपा निवडणुकीत पूजा केली पण प्रसाद न घेता गेलो आणि मनपा निवडणुकीत पराभूत झालो, असे सांगितले. विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर आ. अमित देशमुख आणि आ. धीरज देशमुख यांनीही श्री केशवराजाचे दर्शन, प्रसाद घेतला आहे. त्यामुळे या दोघांनीही आता निवडणुकीची चिंता सोडावी,असेही गोविंदपूरकर यांनी बोलून दाखवले. यज्ञेश्र्वर रंगनाथ महाराजांनी आपल्या मनोगतात सर्व उपस्थितांना शुभाशिर्वाद दिले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते देवस्थानसाठी उत्कृष्ट काम करणाऱ्या अण्णा प्रभाकर पाठक , संजय श्रीकृष्ण अयाचित, गौस शेख, अभियंता शाम देशपांडे, केंद्रे, रविशंकर जाधव यांचा सत्कार करण्यात आला. अनंत कुलकर्णी यांनी यज्ञेश्र्वर महाराजांचा परिचय करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन बसवंतप्पा भरडे यांनी तर आभार योगेश उन्हाळे यांनी मानले. यावेळी देवस्थानचे विश्र्वस्त पापासेठ ताथोडे , मधुकर पाठक , एड. कालिदास देशपांडे, मनोहर सावळे, राजाभाऊ पांडे, दामुशेठ भुतडा, मधुसूदन भुतडा, सुनील अयाचित, शाम कोटलवार, सुमुख गोविंदपूरकर यांसह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## डोंबिवलीचे आमदार आणि सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण आयोजित महाराष्ट्रातील सर्वात मोठा नवरात्री उत्सव नमो रमो नवरात्री



लातूर - मुंबई आणि महाराष्ट्रात डोंबिवलीचा नमो रमो गरबा आता फार प्रसिद्ध झाला आहे. सांस्कृतिक राजधानी म्हणून डोंबिवलीची कीर्ती सर्वत्र आहेच. पण गेली काही वर्ष नमो रमो नवरात्री या नावाने महाराष्ट्रातील सर्वात मोठा नवरात्री उत्सवही डोंबिवलीतच साजरा केला जातो त्यात जगप्रसिद्ध गरबा कलाकार येण्यास उत्सुक असतात. यंदा गरबा क्वीन या विशेषणाने संबोधली जाणारी गीताबेन रबारी पुन्हा एकदा नवरात्रीचे नऊ दिवस आपल्या नमो रमो नवरात्रीचा उत्सव रंगतदार करण्यास येणार आहे सोबत ख्यातनाम गरबा गायक निलेश गढवी यांची साथ त्यांना लाभणार आहे. नमो रमो नवरात्रीची संकल्पना रुजवणारे आणि सर्व संस्थांच्या पाठीशी नेहमीच खंबीरपणे उभे राहणारे डोंबिवलीचे आमदार आणि महाराष्ट्राचे सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र दादा चव्हाण यांच्यामुळेच हा नवरात्री उत्सव अत्यंत भक्तिभावाने आणि पारंपारिक पद्धतीने साजरा केला जातो. रविंद्र चव्हाण हे नेहमीच सांस्कृतिक, कला, क्रीडा आणि साहित्य या क्षेत्राला मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन देत असतात. त्याचाच एक भाग म्हणून दरवर्षी नमो रमो नवरात्री उत्सवाचे आयोजन मोठ्या दिमाखात करत असतात. यावर्षी देखील अतिशय भक्तिभावाने हिंदू संस्कृतीप्रमाणे श्री अंबे मातेची प्रतिष्ठापना केली गेली. दररोज सकाळ व संध्याकाळ विधिवत पूजा आरती करून महिषासुर मर्दिनीचा गजर करून देवीला नैवेद्य वाढून आवाहन केलं जातं आणि रात्री भव्य मंडपात देवीसमोर गरबा खेळला जातो. केवळ कल्याण डोंबिवलीच नाही तर मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पनवेल रायगड, पालघर तसेच संपूर्ण महाराष्ट्रातून गरबा खेळण्यासाठी पारंपारिक वेशभूषेत गरबा प्रेमी अवघी तरुणाई या नमो रमो नवरात्रीत उत्साहात सहभागी होतात. नमो रमो नवरात्रीच्या स्थळाचं पावित्र्य तिथे मंडपातच उभारलेल्या अंबे मातेच्या मंदिरात आहे. आणि यंदाचं अजून एक प्रमुख आकर्षण म्हणजे मातेच्या या मंदिरात दररोज नव्या नव्या रंगांच्या ताज्या नैसर्गिक फुलांची सजावट करण्यात येणार आहे. ख्यातनाम पुष्परचनाकार श्याम भगत यांच्यातर्फे सजावट करण्यात येणार आहे.

सालाबादप्रमाणे या वर्षीही सुप्रसिद्ध कला दिग्दर्शक संजय धबडे ह्यांनी भव्य सेट उभारला आहे. तसेच यावर्षी पूर्ण वातानुकूलित ७० हजार स्क्वेअर फूट जागेमध्ये स्वस्तिक इव्हेंट्सचे अनिल पासड ह्यांनी १३५ फूट बाय ५०० फूट अशा भव्य एसी डोमची निर्मिती केली आहे. या उत्सवामध्ये फक्त गुजराथी समाज नव्हे तर सर्व जाती आणि धर्माचे लोक मोठ्या संख्येने उत्साहाने सहभागी होतात, अशी माहिती आमदार व मंत्री रविंद्र चव्हाण यांनी दिली. टीटू कुलकर्णी ह्यांचा जबरदस्त साऊंड असून दरवर्षी प्रमाणे यंदाही गरबा प्रेमींना सुरक्षित, निरोगी आणि आनंदी वातावरणात गरब्याचा मनमुराद आनंद लुटता यासाठी प्रत्येक छोट्या मोठ्या गोष्टींवर बारकाईने विशेष लक्ष देण्यात आले आहे. म्हणूनच एसी टॉयलेट्स, अनुचित प्रकार टाळण्यासाठी सीसीटीव्ही आणि बाऊन्सर्सची प्रायव्हेट सिक्युरिटी या बरोबरच फूड कोर्ट, पार्किंग, सेल्फी पॉईंट्स अशी उत्तम व्यवस्था केली आहे. पर्यावरणाचा संदेश देणाऱ्या पर्यावरण पूरक कचरा पेट्या बसविण्यात आल्या असून जलचर जीवन वाचवा (क्वा लाईफ) ही संकल्पना त्यातून मांडली आहे. संपूर्ण डोंबिवली परिसरात नमो रमो गरबामुळे एक अनोखी ऊर्जा वातावरणात निर्माण झाली आहे.

आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.dainiklaturprabhat.in

## झरोका

एक – सर्वकस विकासासाठी कार्यरत असलेल्या शिंदे सरकार मध्ये विष बाधेचा प्रकार कसा काय घडतो आहे, हेच कळत नाही, यातील गौडबंगाल काय असावे हेच कळत नाही. डोकं बधीर झाल आहे.

दुसरा – अरे, रोज उठून डोकं बधीर झालं, बधीर झालं, असं म्हणतोस, तूझ डोकं आहे की, खोकं आहे हेच कळत नाही. आता विषबाधा म्हणतोस, म्हणजे नेमकं काय हे तरी सांग.

एक – अहो, सांगली मध्ये नवरात्रीच्या उपवासाच्या भगरी मध्ये पिठात बनवलेल्या खाद्यात विषबाधा झाली. लातूर येथील पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतन मुलीच्या वस्तीगृहात भोजणातून विषबाधा झाली. सरकार सक्षम आहे, पारदर्शक आहे, मग विषबाधा होतेच कशी, मागील महिण्या मध्ये बालाजी मंदिरामधील लाडू प्रसादामध्ये प्राण्याची चरबी आढळली गेली, सारा देशभरात चर्चा होत असताना विषबाधेचे गांभीर्य सरकार मनावर का घेत नाही, यातील मनसोबा काय असावा म्हणून बोलातोय.

दुसरा – अरे, सरकार, ठेकेदार, आणि त्या, त्या संस्था या एकमेकाच्या बांधील असतात. त्यामूळे चरबी काय, आणि भगर, किंवा जेवणातील विषबाधा काय, या किरकोळ बाबी ठरतात. कारण तपास यंत्रणा त्यांचीच असते त्यामूळे आपापाचा माल, गपा गपा होत असतो. त्याचे काय घेवून बसलास.

एक – अहो, जनतेचा पैसा असतो. नवरात्र महोत्सव असो किंवा अन्य कुठले प्रसंग असोत किंवा मुला, मुलीचे वस्तीगृह असोत, या ठिकाणची जनता जी आहे, ती भारताची मानवी संपती आहे. ती जर बाधीत होत असेल तर, अशा या सरकारला घेवून चाटायचे काय, म्हणून संताप व्यक्त करतो आहे, यावर कोणी न्यायीक भुमिका घेईल काय अशी अपेक्षा वाटते.

दुसरा – अरे, जास्त बडबड करु नकोस. विधानसभा निवडणूका लागल्या आहेत, न्यायीक भुमिका घेण्यासाठी वेळ नाही, कदाचीत आमची सत्ता आली तर काय ते बघून घेवू, नाही तर जो कोणी येईल ते, टाळ्या वाजवीत बसेल, डोक्याला ताण देवू नकोस.

## सत्तेपुढे स्मारकाचे काय ?

### संपादकीय...

सद्या परिस्थिती मध्ये महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने सर्वपक्षीय राजकीय हालचाल होत असताना मधल्या काळा मध्ये प्रधान मंत्री नरेंद्र मोदी यानी अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजाचे स्मारक उभे करण्यासाठीचे पुजन केले होते, परंतू आजवर सत्ताकाराच्या धांगडधिंग्यात शिवाजी महाराजाचे स्मारक हरवले, त्याचा शोध घेण्यासाठी माजी खासदार छत्रपती संभाजी राज्य यांनी स्मारक कोठे होते आहे, याचा शोध घेण्यासाठीचा प्रयत्न कालरोजी केला आणि राज्य शासनाने मात्र गेट वे ऑफ इंडिया येथून बोटीने शोध घेण्यासाठीची परवाणगी दिली. परंतू गेल्या आठ वर्षापासून स्मारक रखडल्या बद्दल त्या ठिकाणा पर्यंत न जावू देता त्यांना परत बोलवीले गेले. ही बाब सरकारच्या मर्द पणाची असली तरी छत्रपती शिवाजी महाराजाचे नांव घेवून सत्ताकारण करणाऱ्या शिंदे सरकारला अपेशाचीच बाब ठरावी लागेल अशी राजकीय वर्तूळात कुजबूज होताना दिसते आहे.

आजकालच्या राजकीय वातावरणात सर्वपक्षीय नेत्याना सत्ता आणि खुर्चीसाठी महापुरुषांची स्मारके उभारणे किंवा तशा घोषणा करुन ती कारवाई लोमकळीत ठेवणे आणि सत्ता खुर्चीचा सापसीडीचा खेळ करणे, हेच महत्वाचे वाटू लागल्याचे दिसू लागले आहे. आज घडीला कॉंग्रेस, भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी जे कोणते राजकीय पक्ष आहे, या सर्वाना कोणत्याही महापुरुषाचे देणे, घेणे नाही. सत्ता बाप आणि खुर्ची माय समजून सर्वकांही खेळखंडोबा करीत असताना दिसतात. महाराष्ट्र सरकार असो किंवा भारत सरकार असो या सर्व सत्ताधाऱ्यांना राज्याच्या किंवा देशाच्या विकासासाठी कांहीच देणे, घेणे नाही. केवळ फोडा-फोडी, जोडा-जोडीचे राजकारण करुन स्वतः चा पाया मजबूत करण्यापलीकडे याना कोणतेही काम नसावे असेच स्पष्टीकरण समोर दिसते आहे. कारण विकासाच्या नावाखाली जनतेला जनतेच्याच पैशातून जनतेलाच भुरळ घालायची आणि आम्ही हे करतो आहोत, ते करतो आहोत, मागच्याणी काय केलं, आमच्या समोर तर धतुऱ्याचे पाण आहेत, त्यांच्याकडे पळसाचे पाणं ही नव्हते, त्यामूळे आम्ही त्रिकूट सत्ताकारण करुन सर्वसामान्य जनतेला विकासाच्या धाग्या मध्ये बांधत असताना शिवस्मारकावरुन कोणा संभाजे राजेनी शिवस्मारक कोठे आहे म्हणून शोध घेण्याचा प्रयत्न का करावा असा सवाल सर्वसामान्य जनतेला पोखरत असला तरी सरकार मात्र सत्तेसाठी वाटेल ते करण्यासाठी तयार असल्याने नाममात्र विषयावर कोणी जनतेची दिशाभूल करु नये असे सरकारचे म्हणणे असल्यामूळे या संदर्भात राजकीय वर्तूळात चिडीचुप्पी का दिसते आहे. याचेच आश्चर्य वाटते.

देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने लंडन, नागपूर, महू, मुंबई, महाड, कुलाबा, अशा अनेक ठिकाणी राष्ट्रीय स्मारके उभा करण्याची घोषणा झाली. देवेंद्र फडणवीस आणि प्रधान मंत्री नरेंद्र मोदी यांनी छाती फाडून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारके आंतरराष्ट्रीय स्मारके उभे करण्याच्या बतावण्या केल्या. परंतू गेली पधरा वर्षे ती स्मारके कुठपर्यंत आली ती अद्याप कोणाच्या नजरे समोर नाही. मुंबई भारता बाहेरचे जावू द्या, परंतू खूद्द इंदू मिल परिसरातील राष्ट्रीय स्मारक तरी कुठपर्यंत आलेले आहे, ते मोदीला दिसत नसेल परंतू फडणवीस-शिंदे, अजित पवार यांच्या डोळ्या माती गेली असावी की काय, अशीच लोकभावना व्यक्त होत असून माजी खासदार संभाजी राजे यांनी शिवस्मारक कोठे आहे, याची चौकशी करण्याचा प्रयत्न केला. तर कोणाच्या बापाचे बिघडते, अशीच उलटसूलट प्रतिक्रिया सर्वसामान्य जनतेतून व्यक्त होताना दिसते आहे.

छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक उभे करण्यासाठी अरबी समुद्रात गेट वे ऑफ इंडिया पासून ५०० मीटर अंतराच्या पुढील भागात मध्येभागी पाचहाजार चौरस फुटा मध्ये शिवस्मारक उभे करण्यासाठीचे भुमिपूजन प्रधान मंत्री नरेंद्र मोदी यांनी केले होते. परंतू ते स्मारक कुठपर्यंत आले आहेत, या बाबत प्रधान मंत्री नरेंद्र मोदी यांनी आजवर सत्ताभोगलेल्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, माजी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे, विद्यमान मुख्यमंत्री, एकनाथ शिंदे यांचेशी का चर्चा केली नाही. उठसूठ मुंबईला येणे गळा काढून कांगावा करुन निष्क्रीय घोषणा करायच्या विविध योजनाचे पालूपद लावायचे आणि दिल्ली जायचे हे पंतप्रधानाचे कार्य असते काय असाही खोचक सवाल सर्वसामान्यातून व्यक्त होताना दिसतो आहे.

विशेष म्हणजे आजघडीला बाबासाहेब आंबेडकर आणि शिवाजी महाराज यांच्या क्रांतीकारी भुमीकेशी सांगड घालून विधानसभा निवडणूकीचा फड गांजविला जाणार असल्याची कसरत चालू असताना शिव स्मारका संदर्भात आणि डॉ. बाबसााहेब आंबेडकर यांच्या राष्ट्रीय स्मारका संदर्भात विधानसभा निवडणूकीपूर्वी राज्य शासनाने निर्णय जाहिर करावा अशी लोकभावना व्यक्त होताना दिसते आहे.

## ......तर पुण्याचा बिहार होईल

बोपदेव घाटात गुरुवारी मित्रासोबत फिरायला गेलेल्या तरुणीवर तिघांनी बलात्कार केल्याची धक्कादायक घटना पुण्यात घडली. ही घटना ताजी असतानाच पुण्यातच दोन शाळकरी मुलींवर स्कूल व्हॅन चालकाने अत्याचार केल्याची घटना समोर आली या दोन घटनांनी पुणे शहर हादरले.

अर्थात सांस्कृतिक शहर असलेल्या पुण्याला महिला अत्याचाराच्या घटना नवीन नाहीत. गेल्या वर्षभरात पुण्यात महिला अत्याचाराच्या घटनात सातत्याने वाढ होत आहे या घटनांनी सांस्कृतिक शहर असलेल्या पुण्याची मान शरमेने खाली झुकत आहे. मागील वर्षी राजगडाच्या पायथ्याशी दर्शना पवार नावाच्या उच्च शिक्षित मुलीची हत्या झाली होती. त्याचवेळी सदाशिव पेठेत भर दिवसा युवतीचा पाठलाग करून तिच्यावर कोयत्याने वार करण्याची घटना घडली होती प्रसंगावधान राखून एका युवकाने कोयता हिसकावून घेतल्याने त्या युवतीचे प्राण वाचले.

सातत्याने घडणाऱ्या या घटनांनी पुण्यातील मुलींच्या सुरक्षेचा प्रश्र्न ऐरणीवर आला आहे. या घटना पुण्यासारख्या देशाच्या सांस्कृतिक राजधानीत आणि विद्येच्या माहेरघरात घडल्याने पुण्यासारख्या सुसंस्कृत शहराची मान शरमेने खाली झुकली आहे. एकेकाळी पुणे हे मुलींसाठी सर्वात सुरक्षित शहर समजले जात होते मात्र मागील काही वर्षापासून पुण्याची ही ओळख पुसली जात आहे. पुण्यात मागील सहा महिन्यात महिला अत्याचाराच्या ३६० घटना घडल्या आहेत. ही आकडेवारी चिंताजनक आहे. पुणे हे विद्येचे माहेरघर समजले जाते. सर्व प्रकारचे उच्च शिक्षण देणाऱ्या सर्वोत्तम संस्था पुण्यात आहे.

पुण्यातील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ हे भारतातच नाही तर जगात प्रसिद्ध आहे. शिवाय एमपीएससी, यूपीएससी सारख्या स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या अनेक संस्था पुण्यात आहेत त्यामुळे पुण्यात उच्च शिक्षणासाठी संपुर्ण देशातून विद्यार्थी येतात त्यात मुलींची संख्या लाक्षणिक असते. या विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत किमान चार ते पाच वर्षे लागतात. या चार पाच वर्षात या विद्यार्थ्यांचा मुक्काम पुण्यातच असतो. काही विद्यार्थी वसतिगृहात राहतात तर काही विद्यार्थी ग्रुप करून खाजगी खोली घेऊन भाडेतत्त्वावर राहतात. शिक्षणासाठी देशातील विविध भागांतील विद्यार्थी एकत्र येतात त्यांच्यात मैत्री होते कधी कधी या मैत्रीचे रूपांतर प्रेमात होते. कुटुंबापासून दूर असल्याने त्यांना कोणी हटकायलाही नसते. काही दिवस प्रेमात निघून गेल्यावर त्यांच्यात वाद निर्माण होतो मग दोघांचे ब्रेकअप होते मग त्यातूनच तू मेरी नही हो सकती तो किसीं की नहीं हो सकती या बॉलीवूडपटातील नायकाप्रमाणे मुले मुलींना त्रास देतात त्यातून मुलींवर अत्याचार आणि हत्या अशा घटना घडतात. काही वेळा एकतर्फी प्रेमातून तर काही वेळा गुंड प्रवृत्तीच्या लोकांकडून अशा घटना घडतात. आता तर शाळकरी मुलींवर देखील अत्याचार होऊ लागले आहे.

जर अशा घटना घडतच राहिल्या तर पालक पुण्यात आपल्या पाल्याला शिकायला पाठवणार नाही. पुण्यातच नाही तर कोणत्याच शहरात पाठवणार नाहीत कारण पुण्यासारख्या शहरात जर मुली सुरक्षित राहू शकत नाही तर ती कुठेच सुरक्षित राहू शकत नाही अशीच पालकांची धारणा आहे. सभ्य लोकांचे सुसंस्कृत शहर ही पुण्याची ओळख इतिहासजमा होते की काय अशी शंका येऊ लागली आहे कारण पुण्यात अलीकडे गुन्हेगारी मोठया प्रमाणात वाढली आहे. पुण्यात कोयता गँगने दहशत माजवली आहे. भर दिवसा मुलींची हत्या होत आहे याचाच अर्थ हल्लेखोरांना कायद्याचा धाक उरला नाही आपण काहीही केले तरी कायदा आपले काहीही करू शकत नाही अशीच धारणा गुन्हेगारांची झाली आहे. गुन्हेगारांना पोलिसांचा भीती वाटत नाही. भर दिवसा जर अशा घटना घडत असतील ती पुणे पोलिसांसाठी नामुष्कीची बाब आहे. पुण्यात गुन्हेगारी अशीच वाढत राहिली तर भविष्यात पुण्याचा बिहार होऊ शकतो तो होऊ द्यायचा नसेल तर पोलिसांनी पुण्यातील गुन्हेगारी रोखण्यासाठी कठोर पावले उचलायला हवीत. महिला अत्याचार किंवा भर दिवसा मुलींवर हल्ला करणाऱ्या हल्लेखोरांना कठोरात कठोर शिक्षा व्हायला हवी. गुन्हेगारांना कायद्याचा धाक राहिला तरच सभ्य लोकांचे सुसंस्कृत पुणे ही पुण्याची ओळख कायम राहील अन्यथा पुण्याचा बिहार होईल.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## काय बोलता राव ?

अनुभवी व्यक्तीमत्व असलेले सामाजीक, राजकीय, सत्ताकारणात धुंरीत असलेले नेते भाजपाचा त्याग करुन शरद पवार यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस मध्ये आज प्रवेश केले, त्यांचे नांव हर्षवर्धन पाटील.

### काय बोलता राव,

अरे, हे पाटील आहेत की, कुणबी आहे हे माहित नाही. परंतू हेच हर्षवर्धन पाटील यापूर्वी भाजपात जाण्यापूर्वी कॉंग्रेसचे नेते होते. आमदार आणि अनेक खात्याचे मंत्री राहीलेले हर्षवर्धन पाटील हे त्यांच्याच घराणेशाही मध्ये कॉंग्रेसची सत्ता कशासाठी असा प्रश्न निर्माण झाल्यामूळे पक्ष श्रेष्टीणी त्यांना पक्षाचे तिकीट नाकारले, आणि नेतेपदी राहा म्हणून सल्ला दिला. परंतू सत्तापदाची हाव ही कोणालाही गप्प बसू देत नाही, म्हणून हेच पाटील भाजपात गेले, आणि कमळाच्या पाकळ्या ऐवजी पाणालाच गोजांरीत बसले, डपक्यातल कमळ त्यांना सहन होत नव्हतं, म्हणून त्यांनी इकडं तिकडं बघीतलं आणि चंद्राची सावली थंड वाटते म्हणून शरदचंद्र पवार यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची सावली त्यांना थंड वाटू लागली. आणि इंदापूर विधानसभा मतदार संघ जवळचा वाटू लागला म्हणूनच हर्षवर्धन पाटील यांनी पवारांची तुतारी हाती धरली. कारण एक अनुभवी व्यक्तीमत्व म्हणून आपण त्यांच पक्षात स्वागत करु या, कारण त्यांना राजकारणाचा तसेच अनेक पक्षांचाही प्रचंड अनूभव आहे. म्हणून त्यांच चांगभल मग ते काय बोला दाजीबा !

## अधिकृतपणे माता रमाई आंबेडकर नाव न देता जनतेची दिशाभूल केल्याने पूर्व भाग कृती समितीने काळ्या फिती बांधून केला जाहीर निषेध

लातूर-लातूर शहर पूर्व भागातील लेबर कॉलनी



येथील शासकीय स्त्री रुग्णालयाचे नागरिकांच्या मागणीची दखल घेऊन स्थानिक आमदार अमित देशमुख यांच्या सूचनेवरून तत्कालीन महानगरपालिका सभागृहात शासकीय रुग्णालयाचे नाव त्याग मूर्ती माता रमाई आंबेडकर शासकीय रुग्णालय ठराव संमत करण्यात आले तसे दर्शनी भागात माता रमाई आंबेडकर स्त्री रुग्णालय नाव लिहिण्यात आले पण अद्यापही या रुग्णालयाचे अधिकृतपणे /कागदोपत्री माता रमाई आंबेडकर शासकीय स्त्री रुग्णालय नाव देण्यात आले नाही नसल्याची गंभीर दखल प्रशासनाने घेऊन सकारात्मक कार्यवाही करावी म्हणून लातूर शहर पूर्व भाग नागरी कृती समितीने या पूर्वी अनेक वेळा निवेदने देऊनही दखल घेतली जात नसल्याने आज दिनांक सात ऑक्टोबर रोजी दुपारी एक वाजण्याच्या दरम्यान लातूर शहर पूर्व भाग नागरी कृती समितीच्या शिष्टमंडळाने काळे कपडे व काळ्या फिती बांधून स्थानिक आमदार अमित देशमुख व प्रशासनाचा जाहीर निषेध व्यक्त करीत आज प्रशासन प्रमुख वैद्यकीय अधीक्षक रवींद्र भालेराव यांना प्रतक्ष भेटून जाहीर

निषध व्यक्त करीत छायाताई कांबळे यांच्या हास्ते निवेदन देण्यात आले. निवेदनावर लवकरच सकारात्मक कार्यवाही नाही झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा समितीचे अध्यक्ष दीपक गंगणे, सचिव बाबासाहेब बनसोडे,विजयदादा गायकवाड, नितीन चालाक,राजकुमार सोनवणे,कमलाकर कांबळे,महेश नंदवे, गौतम ससाणे, भगवेश्र्वर धनगर इत्यादींने दिला आहे

## पाशा पटेल यांचा 'हरित नायक' पुरस्काराने सन्मान

मुंबई: देशामधील बांबू आधारित उत्पादकांना 'होमेथॉन-२०२४' व्यासपीठ देऊन पर्यावरण रक्षणासाठी बांबू लागवड आणि प्रक्रियेची चळवळ उभारणाऱ्या राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष आणि मुख्यमंत्री पर्यावरण संतुलित शाश्र्वत विकास टास्क फोर्सचे कार्यकारी अध्यक्ष पाशा पटेल यांना यंदाचा 'हरित नायक' (त्रीशशप क्शी) पुरस्कार देऊन गौरवण्यात आले आहे.









देशामध्ये वास्तु निर्माणाच्या क्षेत्रातील 'नरेडको' महाराष्ट्राच्या वतीने ' होमेथॉन प्रॉपर्टी एक्स्पो २०२४' या प्रदर्शनाचे आयोजन ४ ते ६ ऑक्टोबर २०२४ दरम्यान मुंबईतील जिओ वर्ल्ड कन्वेशन सेंटर बीकेसी या ठिकाणी नुकतेच पार पडले.

काल झालेल्या समारोपाच्या पुरस्कार वितरण कार्यक्रमात नरेडकोचे उपाध्यक्ष राजन बांदेलकर, नरेडको महाराष्ट्र अध्यक्ष प्रशांत शर्मा आणि नरेडकोचे सचिव राजेश दोशी उपस्थित होते.

यावेळी बोलताना पाशा पटेल म्हणाले, ' होमेथॉन प्रॉपर्टी एक्स्पो-२०२४' प्रदर्शनाच्या निमित्ताने पहिल्यांदाच बिल्डर आणि शेतकरी यांची युती झाली होती. प्रॉपर्टी प्रदर्शनाच्या जोडीने बांबूआधारीत उत्पादने फर्निचर रिअल इस्टेट उद्योजक आणि ग्राहकांच्या पसंतीस पडले आहे.

पाशा पटेल यांनी मानव जातीच्या रक्षणासाठी बांबू लागवड आणि बांबू आधारित उत्पादने वापरणे आवश्यक असल्याचे ठामपणे सांगितले.ते पुढे म्हणाले जवळपास बांधकाम क्षेत्राकडून २८% कार्बन उत्सर्जन होते. घर बांधा पण झाड तोडू नका हे तत्व स्वीकारून यापुढील काळात सर्व बांधकाम क्षेत्रातील बिल्डर हे दरवाजे फर्निचर सह बांबूपासून बनवलेले फ्लोरिंग देखील वापरण्यावर सहमती झाली आहे.

यावेळी बोलताना राजन बांदेलकर म्हणाले,

'होमेथॉन प्रॉपर्टी एक्स्पो २०२४' प्रदर्शनाची यंदाची थीम हरित प्रदर्शन होती. त्यासाठी आम्ही पाशा पटेल यांच्या नेतृत्वाखालील फिनिक्स फाउंडेशन संस्थेबरोबर भागीदारी केली आहे. या भागीदारीमुळे नरेडको सदस्य हे बांधकाम विकासामध्ये प्रामुख्याने बांबूच्या वापराबाबत जागृती वाढली आहे त्याशिवाय भविष्यात पर्यावरण स्नेही इमारती आणि घरे निर्माण करण्यासाठी निश्र्चितपणे दिशा मिळाली आहे.

होमेथॉन एक्स्पो २०२४ चा प्रसार हा बॉलिवूड मधील प्रसिध्द जोडी रितेश आणि जिनिलिया देशमुख यांनी केले होते. १००० हून अधिक असे महाराष्ट्रातील प्रतिशयश व्यावसायिकां चे प्रकल्प सादर करण्यात आले याशिवाय हे प्रकल्प परवडणाऱ्या घरांसह लक्झरी विभागात असून त्यांची किंमत रु १९ लाखांपासून ते रु ९ कोटींपर्यंतचे होते. या प्रदर्शनात काही सवलती जसे नो स्टॅम्प ड्युटी किंवा रजिस्ट्रेशन चार्जेस सह प्रतिशय वित्तीय संस्थांकडून गृहकर्ज योजना सुध्दा सादर करण्यात आल्या. या एक्स्पो मध्ये मुंबई आणि एमएमआर सह ठाणे, कल्याण, नवी मुंबई, पनवेल, रायगड, मिरारोड, वसई, विरार इत्यादी सह पुणे, नाशिक आणि नागपूर येथील प्रकल्पही उपलब्ध आहेत.

## वजन कमी करण्यासाठी भात खाऊ शकता, कसे ते जाणून घ्या...



जर तुमचे वजन कमी होत नसेल तर बहुतेक लोक तुम्हाला भात न खाण्याचा सल्ला देतात. कारण रिकाम्या भात खाल्ल्याने वजन वाढते. यामुळे अनेकजणांना भात आवडत असला तरी वजना अभावी भात खाणे बंद करतात. तांदूळ हे जगातील सर्वाधिक खाल्ल्या जाणाऱ्या धान्यांपैकी एक आहे. तांदूळ भारतात विशेषत: दक्षिण भारतात सर्वाधिक वापरला जातो. इडली, डोसा, उत्तपा इत्यादी अनेक प्रसिद्ध दक्षिण भारतीय पदार्थांमध्ये भाताचा वापर करताना तुम्ही अनेकदा पाहिले असेल. याशिवाय इथले लोक त्यांच्या रोजच्या आहारात आणि खाण्याच्या सवयीमध्ये भाताचा नक्कीच समावेश करतात तरी तुम्हाला प्रश्न पडला असेल की, भात खाल्ल्याने वजन वाढते, मग इथे राहणारे लोक लठ्ठ का नाहीत?

सर्वात आधी हे जाणून घेणे गरजेचे आहे की, भात खाल्ल्याने वजन वाढते का? आयुर्वेद तज्ञांचे मते, पांढरा तांदूळ शुद्ध असतो. त्यात कार्बोहायड्रेटचे प्रमाण जास्त असते. तसेच त्यात उच्च ग्लायसेमिक इंडेक्स देखील आहे आणि शुद्धीकरण प्रक्रियेदरम्यान फायबरसह अनेक खनिजे नष्ट होतात. त्यामुळे जेव्हा एखादी व्यक्ती पांढरा भात खातो तेव्हा शरीरातील साखर लगेचच कमी होते आणि रक्त विरघळते. लठ्ठपणा किंवा वजन वाढण्यामागे बहुतेक लोक पांढऱ्या भाताला मुख्य कारण मानतात.

दाक्षिणात्य भात तयार करण्याची पद्धत त्यांना लठ्ठ होऊ देत नाही, असे तज्ज्ञांनी सांगितले. दक्षिणेत, लोक सामान्य तांदूळ वापरतात आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे ते तांदूळ तयार करण्यासाठी प्रेशर कुकर वापरत नाहीत. गरम भात शिजवताना त्यात येणारा फेस निघून जातो. भांड्यात भात शिजवताना त्यात येणारा फेस निघून जातो. खरेतर पाण्यातील हा फेस लठ्ठपणासह अनेत समस्यांचे मुख्य कारण आहे. त्यामुळे नेहमी सामान्य तांदूळ हा भांड्यातच शिजवण्याचा प्रयत्न करा.

तज्ज्ञांनी सांगितले की, पांढरे पॉलिश केलेले तांदूळ हे वजन वाढण्याचे सर्वात मोठे कारण आहे. वजन वाढणे थांबवयाचं असेल तर पांढरा भात खाणे बंद करा. पांढरा पॉलिश केला तांदूळ उच्च रक्तदाब, उच्च रक्त शर्करा, उच्च ट्रायग्लिसराइड पातळी, उच्च कोलेस्ट्रॉल इत्यादी समस्यांशी संबंधित आहे. अंड्यातील पिवळ बलक, फायबर आणि पोषक तत्वांनी युक्त ब्राऊन राइस वजन कमी करण्यासाठी सर्वोत्तम मानला जातो. कोरियातील १०,००० प्रौढांवर केलेल्या अभ्यासात असे दिसून आले की ज्यांनी पांढरा भात खाल्ला त्यांना मधुमेह होण्याची शक्यता जास्त आहे.

सामान्य तांदूळ वापरल्यास अनेक फायदे मिळू शकतात. असे मानले जाते की, अर्धा कप शिजवलेल्या भातामध्ये फक्त १२० कॅलरीज असतात, जे एका लहान ब्रेडपेक्षा कमी असते. तुम्ही अस्वास्थ्यकर भात खाल्ल्यास तुमचे वजन वाढू शकते. याव्यतिरिक्त, जर तुम्ही प्रथिनेयुक्त डाळ आणि पौष्टिकतेने समृद्ध भाज्या यांसारख्या आरोग्यदायी घटकांसह भात खल्यास एकत्र केले तर ते वजन कमी करण्यास मदत करू शकते. तज्ज्ञांचे मत आहे की, भाताचे काही भाग नियंत्रित करणे खूप महत्त्वाचे आहे, म्हणजेच तुम्ही किती भात खावे यावर नियंत्रण ठेवावे.

# महाराष्ट्र राज्य स्वतंत्र विद्युत कंत्राटी कामगार संघटनेचा नागपूर येथे मेळावा संपन्न.

नागपूर : दिनांक ६ ऑक्टोबर २०२४ रोजी मा.जे.एस.पाटील साहेब अध्यक्ष स्वतंत्र मजदूर युनियन यांच्या ६९ व्या वाढदिवसानिमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर कामगार प्रशिक्षण केंद्र,प्रेरणा नगर हजारी पहाड नागपूर येथे विद्युत कंत्राटी कामगार यांचा संकल्प मेळावा संपन्न झाला. या संकल्प मेळाव्यामध्ये तेलंगणा राज्याचे मा.देवेंद्रजी व दिल्ली राज्यातून ठेका मजदूर कर्मचारी संघटन व राष्ट्रीय भागीदारी मोर्चाचे अध्यक्ष मा.डी . सी.कपिल साहेब,मा. वाय.डी मेश्राम साहेब अध्यक्ष बॅकवर्ड क्लासेस इंजिनिअर ऍण्ड ऑफिसर्स असोसिएशन,मा.डॉ संजय घोडके साहेब अध्यक्ष महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटन,मान.डी.जी.तायडे साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

संकल्प मेळाव्यामध्ये दिल्ली राज्यामध्ये कंत्राटी कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या सवलती ४० हजार रुपये पर्यंत पगार पेट्रोल अलाउन्स मोबाईल अलाउन्स देण्याची तरतूद आहे. दिल्ली राज्यामध्ये कंत्राटी कामगारांना मिळत असलेल्या सुविधांवर मा.डी.सी कपिल साहेब यांनी सविस्तर मार्गदर्शन केले तसेच तेलंगणा राज्यात बाह्य स्त्रोत विद्युत कंत्राटी कामगार होते त्यांना कंत्राटदारा मार्फत पगार न देता सरळ आर्टिझन पदावर सामावून घेण्यात आले आहे.परंतु महाराष्ट्रात या प्रकारे कारवाई होत नाही व काही संघटना कर्मचाऱ्यांना भ्रमित करून त्यांची दिशाभूल करीत आहे व वेगळ्या प्रकारची मागणी करून सरकारचे समर्थन करण्याचे काम या राज्यात सुरू आहे यावर या सदर




मेळाव्यात सविस्तरपणे चर्चा करण्यात आली मा.जे.एस पाटील साहेब यांच्या ६९ व्या जन्मदिवसाच्या दिनी संकल्प दिन म्हणून साजरा करण्यात त्याच अनुषंगाने ६ ऑक्टोंबर २०२४ रोजी संकल्प दिन म्हणून हा दिन बाह्य स्त्रोत वीज कंत्राटी कामगारांच्या मेळाव्याचे आयोजन करून संपन्न झाला मा.जे.एस.पाटील साहेबांनी ज्याप्रकारे आपले संपूर्ण जीवन या बहुजन कामगार चळवळीला गतिमान करण्या करिता आपले योगदान दिलेले आहे.त्याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली आणि या मेळाव्याच्या माध्यमातून सर्व कंत्राटी कामगार बांधवांना तेलंगाना पॅटर्न दिल्ली पॅटर्न हरियाणा पॅटर्न याबाबत मंचावरील उपस्थित मान्यवरांनी दिली व आपण कोणत्या दिशेने आंदोलन केले पाहिजे याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

मा.जे.एस.पाटील साहेब यांनी वीज कंत्राटी कामगारांवर महाराष्ट्रात होत असलेल्या अन्यायाबाबत खेद व्यक्त करत महाराष्ट्रातील वीज कंत्राटी कामगारांना न्याय मिळवून देण्याकरिता जे काही आपणास होईल ते प्रयत्न करण्याचे सदर मेळाव्यात घोषित केले आणि कंत्राटी कामगारांना तेलंगाना राज्याप्रमाणे कायम करण्यात यावे किंवा दिल्ली राज्याप्रमाणे त्यांना जास्तीत जास्त वेतन देण्याची तरतूद व समान काम समान वेतन या नियमाची अंमलबजावणी महाराष्ट्र राज्यात करण्यात यावी याबाबत आपल्याला मोठे आंदोलन करून आपल्या वीज कंत्राटी कामगार बांधवांना न्याय मिळवून देण्याकरिता आंदोलन उभारण्याची गरज आहे असे यावेळी मत व्यक्त केले.

देशात बहुजन कामगार चळवळ गतिमान करण्याकरिता प्रयत्नशील असलेल्या स्वतंत्र मजदूर युनियन ला आर्थिक मदत म्हणून महाराष्ट्रातील बहुजन कामगारांनी स्वतंत्र मजदूर युनियनच्या राष्ट्रीय अध्यक्ष मा.जे.एस.पाटील साहेब यांना २५ लाख रुपयांच्या संकल्पनिधीचा चेक प्रदान करून आपले सामाजिक दायित्व व बहुजन कामगारांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध लढा उभारण्याकरिता आर्थिक सहकार्य केले सदर सभेचे सूत्रसंचालन श्री बंटी बडगे,प्रास्ताविक श्री.डि.जी.तायडे व आभार प्रदर्शन श्री दयानंद हाडके यांनी केले. सदर संकल्प मेळाव्यात प्रामुख्याने बहुसंखेने वीज कंत्राटी कामगार उपस्थित होते.

# माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या हस्ते लातूर तालुक्यातील कव्हा येथील विविध विकास कामाचे भूमीपुजन व लोकार्पण

लातूर प्रतिनिधी:राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूरचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या हस्ते सोमवार दि. ७ ऑक्टोबर रोजी सायंकाळी लातूर तालुक्यातील कव्हा येथील विविध विकास कामाचे भूमीपुजन व लोकार्पण करण्यात आले. माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी मागील पाच वर्षात ३ कोटीची विकासकामे कव्हा गावांमध्ये केली आहेत. माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी कव्हा येथील गुमास्ता कॉलनी येथील विठ्ठल त्यानंतर आई भवानी सार्वजनिक नवरात्र महोत्सव येथील देवीचे दर्शन घेऊनआरती केली.आमदार देशमुख यांनी शेख मियाँसाब दर्गा येथे चादर अर्पण केली.माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी कव्हा येथील गुमास्ता कॉलीनी येथे सिमेंट काँक्रीट रस्ताचे लोकार्पण केले त्यानंतर कव्हा येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या शॉपिंग कॉम्पलेक्सचे उदघाटनकेले. तसेच कव्हा येथील गावातंर्गत सिमेंट काँक्रीट रस्ता व पेव्हर ब्लॉक रस्ता कामाची पाहणी व कच्हा येथील गावातंर्गत बंदीस्त नाली बांधकाम कामाची पाहणी केली मोजे कव्हा येथे छत्रपती चौक दर्गा परिसर येथे रस्ता पेव्हर ब्लॉक कामाचे भूमीपूजन त्यांनी केले. यावेळी लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव विलास को-ऑपरेटिव बँकेचे व्हाईस चेअरमन समद पटेल संतोष देशमुख,ट्वेंटीवन शुगरचे व्हा. चेअरमन विजय देशमुख माजी नगराध्यक्ष लक्ष्मण कांबळे विलास सहकारी साखर कारखाण्याचे व्हा.




चेअरमन रवींद्र काळे, कव्हा विविध सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन सुधाकर रुकमे, विद्याताई पाटील सुंदर पाटील कव्हेकर गोविंद घार जिल्हा परिषदचे शाखा अभियंता शिवप्रसाद स्वामी तलाठी श्रीकांत उडते ग्रामसेवक सचिन कसबे लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीच उपसभापती सुनील पडीले बोंबले,झिरमिरे, सरपंच पदमीनबाई सुडले उपसरपंच किशोर घार रसुद पठाण सिकंदर पटेल इमरान सय्यद नारायण माने पंडितराव खंडागळे सादिक पठाण बालाजी पुरी अशोक पाटील गोविंद रूकमे तानाजी कदम गोवर्धन कुटवाडे बळीराम चोपडे आदिसह कव्हा ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले की, महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका येत्या काही दिवसात जाहीर होतील त्या जाहीर होण्यापूर्वी कव्हा गावासाठी काही योजना आम्ही मंजूर केल्या गावच्या रस्त्याचा प्रश्न गेले अनेक वर्ष प्रलंबित आहे यासाठी अनेक आंदोलने निवेदने नागरिकांना द्यावी लागली गावाचा विस्तार वाढला आहे असे त्यांनी सांगितले. पुढे बोलताना ते म्हणाले की, राज्यात महाविकास आघाडीचे सरकार असताना मी पालकमंत्री होतो.कोरोना काळात एकमेकांच्या खांद्याला खांदा लावून आपण एकमेकांसोबत उभे राहिलो कव्हा गावची विकासाची भूक मोठी आहे महाराष्ट्रात निवडणुकीचे वारे वाहत आहे महायुती सरकार जाऊन राज्यात महाविकास आघाडीच सरकार येईल तेव्हा मोठ्या प्रमाणात निधी गावाला मिळेल ग्रामस्थांच्या सर्व मागण्या येणाऱ्या काळात पूर्ण करू गावच्या विकासाच्या अनेक योजना आम्ही ग्रामस्थांनी मागणी न करता पूर्ण केल्या आहेत लातूरकर म्हणून आपणाला महाराष्ट्राचा विचार करावा लागेल महाराष्ट्राची सूत्र महाराष्ट्राच्या हाती असावी ती गुजरातच्या हाती नसावीत महाराष्ट्राच्या स्वाभिमानासाठी आम्हाला साथ द्या आम्ही विकासाशी बांधील आहोत मागील पाच वर्षात केलेले काम आपणास आम्ही सांगतो तुम्ही मला पुढील पाच वर्षात काय काम करायचे हे जनतेने मला सांगावे लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने लाडक्या बहिणींना मोफत शून्य बॅलन्स बँक खाते उघडून दिले असे सांगून त्यांनी सर्वांना नवरात्र उत्सवाच्या शुभेच्छा दिल्या.

माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या हस्ते या कार्यक्रमा दरम्यान गोविंद इरले यांना युवक काँग्रेस कव्हा अध्यक्षपदी निवडीचे पत्र देण्यात आले. माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी कव्हा परिसरातील सुधाकर रुकमे यांच्या द ट्री कॅफे अँड रेस्टॉरंट ला सदिच्छा भेट देऊन त्यांच्याशी विविध विषयावर चर्चा केली.

# राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठानच्या समान व असमान निधी योजनांसाठी प्रस्ताव सादर करावेत ई 30 नोव्हेंबरपर्यंत सादर करता येणार प्रस्ताव

लातूर (जिमाका) :- भारत सरकारच्या सांस्कृतीक कार्य विभागांतर्गत कोलकाता येथील राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठानच्या समान निधी व असमान निधी योजनेअंतर्गत राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या सर्वांगीण विकासासाठी अर्थसहाय्याच्या विविध योजना ग्रंथालय संचालनालयामार्फत राबविण्यात येतात. सन २०२४-२५ साठी विविध समान व असमान निधी योजनेचा लाभ घेण्यासाठी राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांकडून विहित नमुन्यात प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. त्या संदर्भातील नियम, अटी व अर्जाचा नमूना ु.ीीश्रष.सीं. ळप या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. इच्छुक ग्रंथालयांनी अर्जाचा नमुना संकेतस्थळावरून उपलब्ध करून घ्यावा.

समान निधी योजना अंतर्गत इमारत बांधकाम व विस्तार अर्थसहाय्य योजनेतून २५ लाख रुपये पर्यंत अनुदान दिले जाते. या उपरोक्त योजनेव्यतिरिक्त समान निधी योजनेंतर्गत इतर योजनांचा लाभ केंद्रीय पद्धतीने देण्यात येत असल्यामुळे इतर योजनेसाठीचे प्रस्ताव सादर करू नयेत.

असमान निधी योजना अंतर्गत ग्रंथालय सेवा देणार्या स्वयंसेवी संस्थाना ग्रंथ, साधनसामग्री, फर्निचर, इमारत बांधकाम व विस्तार यासाठी अर्थ सहाय्य- ( फर्निचर खरेदी रु. ४ लाख व इमारत बांधकाम रु. १० ते १५ लाख), राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान 'ज्ञान कोपरा' विकसित करण्यासाठी अर्थसहाय्य-(रु. २.५० लाख) व विशेष अर्थसहाय्य आधुनिकीकरण ( रु. २ लाख), महोत्सवी वर्ष जसे ५०/६०/७५/१००/१२५/१५० वर्षे साजरे करण्यासाठी अर्थ सहाय्य- (६.२० लाख/ व इमारत विस्तार रु. १० लाख) , राष्ट्रस्तरीय चर्चासत्र कार्यशाळा, प्रशिक्षण वर्ग व जागरूकता कार्यक्रम आयोजनासाठी अर्थसहाय्य (रु. १.५० लाख/रु.२.५० लाख/रु. ३.०० लाख), बाल ग्रंथालय व राजा राममोहन रॉय ग्रंथालय 'बालकोपरा स्थापन' करण्याकरिता अर्थसहाय्य (रु. ६.८०लाख) या योजनांचा लाभ घेण्यासाठी इच्छुकांनी प्रतिष्ठानचे www.rrrlf.gov.in हे संकेतस्थळ पहावे. आवश्यकता असल्यास संबंधित जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा. ग्रंथालयांनी वरील पैकी कोणत्याही एका योजनेसाठीचा प्रस्ताव विहित मार्गाने व मुदतीत आवश्यक कागदपत्रासह इंग्रजी किंवा हिन्दी भाषेत चार प्रतीत संबंधित जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयास ३० नोव्हेंबर, २०२४ पर्यन्त पोहचेल, अशा बेताने पाठवावेत, असे आवाहन अशोक मा. गाडेकर, प्र. ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी केले आहे.

# रामलीला कार्यक्रमास बाभळगाव पंचक्रोशीतील नागरिकांचा दिवसेंदिवस या कार्यक्रमाला वाढता प्रतिसाद

लातूर प्रतिनिधी:बाभळगाव येथे दसरा महोत्सवानिमित्त आंतरराष्ट्रीय ख्यातीचे स्वामी श्री भुवनेश्र्वर वशीष्ठजी महाराज यांची रामलीला कथा कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, मैदान,बाभळगाव येथे आयोजीत करण्यात आली आहे.या रामलीला कार्यक्रमास बाबळगाव सह परिसरातील विविध गावातील भाविक भक्त आपल्या कुटुंबीयांसह रामलीला कार्यक्रमास उपस्थित राहून कार्यक्रमाचा आनंद घेत असून बाभळगाव पंचक्रोशीतील नागरिकांचा दिवसेंदिवस या कार्यक्रमाला वाढता प्रतिसाद मिळत आहे.दसरा महोत्सवानिमीत्त बाभळगाव येथे नवरात्र महोत्सव समिती,ग्रामपंचायत,सेवा सोसायटी, तंटामुक्त ग्राम समिती व ग्रामस्थ बाभळगाव यांच्या वतीने रामलीला आंतरराष्ट्रीय ख्यातीचे स्वामी श्री भुवनेश्र्वर वशीष्ठजी यांची रामलीला कै.व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, मैदान, बाभळगाव येथे सुरु आहे.



सोमवार दि. ७ ऑक्टोबर रोजी श्री सुनील मिटकरी सहाय्यक संचालक नगर रचनाकार, श्री निखिल कोडे नगर रचनाकार श्री अविनाश रेड्डी सहाय्यक नगर रचनाकार लातूर यांनी उपस्थित राहून आरती केली आणि रामलीला कार्यक्रम पाहिला.

यावेळी सुधाकर भालके, सौ भालके उपसरपंच गोविंद देशमुख, ग्राम पंचायत सदस्य गोपाळ थडकर, पोपट अवघडे, व्हश्र चेअरमन शिवाजी जाधव, संतोष महादेव देशमुख, गणपत भाडुळे भिमराव शिंदे,अविनाश देशमुख, उमेश मस्के, सगर,भानुदास आयरेकर,संतोष महादेव देशमुख,गणपती भाडुळे, शिवाजी जाधव,नंदकुमार जोशी, सोनटक्के गुरूजी,भरत थडकर, भगवान तोडकर,सादिक सय्यद, पांडुरंग देशमुख,सादु मस्के, रामकिसन अवघडे,बाबुराव सगर यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आदरणीय सागर तायडे एक विवेकी सत्यशोधक...

फुले शाहू आंबेडकर यांच्या विचाराचे खंद्दे पुरस्कर्ते स्वतंत्र मजदूर युनियनचे राज्य अध्यक्ष,सत्यशोधक कामगार संघटनेचे संस्थापक सदस्य,मुक्तनायकचे स्तंभ लेखक , सहा दशकापासून ते वृत्तपत्रांमध्ये लिखाण करतात.साहित्यिक सागर लाटा लेख संग्रहाचे लेखक,आरक्षण लभार्थीनी शासनकर्ती जमात बनावे.हे कामगारांना त्यांच्या हक्क व अधिकाराची जाणीव करून देणारे त्याचे कामगार ट्रेड युनियन वरील ४८ पानाचे पुस्तक कामगारांना संविधानाचे महत्त्व पटवून देणारे आहे.तसेच असंघटित कष्टकरी कामगार त्यांच्यासाठी असणाऱ्या कल्याणकारी योजनांची माहिती देणे. कल्याणकारी योजना कामगाराच्या पदरात पाडून देण्यासाठी सतत झटणारे,नाका कामगारांच्या समस्या सोडवणे त्यांना व्यसनापासून परावर्तित करणे.विविध संघटना चालवणे प्रत्यक्षपणे कामगाराच्या संपर्कात राहून त्यांना मार्गदर्शन करणे. त्यांच्या समस्या जवळून हाताळणे.असे त्यांच्या कार्याचे स्वरूप आहे.

समाजाला दिशा देण्याचे कार्य करणारे परखड लेखक आहेत.निर्भीडपणे लिखाण करणारे लोक फार कमी असतात.त्यातलेच एक आदरणीय सागर तायडे सर वेळोवेळी चुकीच्या गोष्टीवर ते भाष्य करतात.कितीही मोठा व्यक्ती असेल राजकारणी असेल सत्ताधारी असेल तरी त्या व्यक्ती विषयी ते लिहितात बोलतात.अनेक वेळा त्यांचे लेख वाचताना मला त्याची प्रचिती आलेली आहे.ते सत्य आणि सत्यच मांडतात. देशाच्या सर्वोच्च पदावर असलेल्या राष्ट्रपतीनाही आतापर्यंत त्यांनी त्यांच्या जबाबदारीची जाणीव करून दिलेली आहे.सरकारला तर त्यांनी अनेक वेळा धारेवर घेतलेले. एवढे मोठे व्यक्तिमत्व असूनही त्यांना कसलाही गर्व नाही अभिमान नाही. आमच्यासारख्या अनेक नवोदित लेखकांना ते मार्गदर्शन करतात.त्यांचे लेख प्रसिद्ध करून समाजात मान सन्मान प्रतिष्ठा मिळवून देण्याचे महान काम करतात.परखड व निर्भीड विचारामुळे ते महाराष्ट्रभर पोहोचले.बदल घडवून आणण्यासाठी सातत्याने कार्य करतात. चळवळीत काम करतात.अगदी मनापासून बदल



साहित्यिक म्हणून ते योग्य भूमिका पार पाडतात. त्यांच्या प्रत्येक लेखातून ते करत असलेल्या कार्याची प्रचिती येते.समाजाशी असलेली त्यांची बांधिलकी लक्षात येते. फुले शाहू आंबेडकरांच्या विचाराला त्यांनी प्रत्यक्ष कृतीत उतरवले.आपण शिकलो म्हणून आपले पहिले कर्तव्य आहे की तळागाळातील लोकांना मार्गदर्शन करणे त्यांना मदत करणे.अशी त्यांची विचारसरणी आहे. त्यामुळेच मी माझ्या मैत्रिणी त्यांच्याशी मैत्री भावनेने जोडल्या गेलो आहे.

सध्या अशी परिस्थिती आहे की लेखक काय लिहितो याकडे कुणाचे फारसे लक्ष नसते परंतु तो आपल्या संघटनेचे कार्य करत असेल तरच तो विचार पेरला जातो.परंतु माझा अनुभव आदरणीय सागर तायडे सरांच्या बाबतीत तसा नव्हता त्यांनी मला लिखाणासाठी वेळोवेळी प्रोत्साहन दिले.माझ्या लेखांना महाराष्ट्रभर प्रसिद्धी आदरणीय सागर तायडे सरांमुळेच मिळाली आणि त्यांच्या लेखातूनच मी खूप प्रेरणा घेतली. सर या वयात ही सक्रियपणे लिहितात संघटना व्हावे त्यासाठी ते प्रयत्नशील असतात.मी लिहित राहणार अन्यायविरुद्ध ही त्यांची विचारसरणी प्रेरणादायी आहे.समाजात देशात खूप काही वाईट घडत आहे पण आपण एकटा माणूस काय बदल करणार असा विचार ते करत नाही. महात्मा फुले ही म्हणाले होते की समाजात खूप वाईट घडते तेव्हा काहीच न करता आपण स्वस्थ बसण्यापेक्षा काहीतरी चांगला बदल झाला पाहिजे यासाठी आपण कामाला लागले पाहिजे.महात्मा फुले सारखे सागर तायडे एक सत्यशोधक आहेत देशात समाजात जे जे वाईट आहे ते ते नष्ट करण्यासाठी ते रात्रंदिवस झटतात ही उल्लेखनीय बाब आहे. खरच आदरणीय सागर तायडे सर नावाप्रमाणेच सागरासारखे अथांग आहेत. खरंच मोठी माणसं कधी अहंकार करत नाहीत.इतरांनीही पुढे यावे असे त्यांना नेहमी वाटत असते.

आदरणीय सागर तायडे सर यांचा सागर लाटा नावाचा लेखसंग्रह आहे.अतिशय परखडपणे त्यांनी विचार मांडले आहेत.एकदा एका ग्रुप वर असा मेसेज आला होता की तीन टक्के लोकच वर्तमानपत्र वाचतात.सामान्य लोकांपर्यंत हा विचार कसा जाईल आणि बदल कधी घडेल. तर मला असं वाटतं जे वाचतात ते वैचारिक असतात. संवेदनशील असतात साहित्यिक असतात.ज्यांना बदल व्हावा अशी तळमळ असते. अशा लोकांच्या वाचण्यात आदरणीय सागर तायडे सरांचे लेख आले तर नक्कीच बदल घडेल आणि बदल घडत आहे.त्यांची लेखणी धारदार असली तरी त्यात एक संवेदनशीलपणा आहे. इतरांबद्दलची तळमळ आहे काळजी आहे. प्रसंगी आई मुलाचे कान धरते. ते यासाठीच की मूल चांगलं घडलं पाहिजे वाढलं पाहिजे त्याच भावनेने सर लिखाण करतात. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी शिकलेल्या लोकांवर जो विश्र्वास दाखवला होता तो विश्र्वास आदरणीय सागर तायडे सरांनी पूर्ण केलेला आहे.सागर तायडे सरांप्रमाणे जर शिकलेल्या सुशिक्षित लोकांनी सत्यशोधकी विचाराची कास धरली. वैज्ञानिक दृष्टिकोन लोकांमध्ये रुजवण्याचा प्रयत्न केला तर नक्कीच भारत देश महासत्ता झाल्याशिवाय राहणार नाही.

सागर लाटा हा लेखसंग्रह अतिशय सुंदर आहे.या लेखसंग्रहा मधून लेखकाने आपले परखड विचार प्रभावीपणे मांडलेले आहेत.लेखाचे शीर्षक तर अतिशय मनोवेधक आहे. याविषयी मी सविस्तर लिहिणार आहे.महात्मा फुलेंचे लिखाण जसे व्यवस्थेची चिरफाड करते तसेच तायडे सरांचे लिखाणही व्यवस्थेची चिरफाड करते. सत्यशोधिकी विचारांच्या आदरणीय तायडे सरांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा..या दिवशी महापुरुषाच्या चरणी एवढीच प्रार्थना की त्यांना दीर्घायुष्य लाभावे व त्यांच्या हातून अशीच समाजाची सेवा घडावी.आमच्यासारख्या लेखक लेखिकांना परोपरीने मार्गदर्शन लाभावे.

**लेखिका**
**श्रीम. मनीषा जाधव अंतरकर**
saiantarkargmail.com
**७८२२८२८७०८, अंबड जिल्हा जालना.**

# वैशालीताई देशमुख यांच्या हस्ते श्री माता येडेश्र्वरी देवीची आरती

लातूर : प्रतिनिधीःसद्गुरू नगर, सुशीला देवी नगर, जुना औसा रोड, लातूर येथील श्री माता येडेश्र्वरी देवीची आरती विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन वैशालीताई विलासराव देशमुख यांच्या हस्ते सोमवारी सायंकाळी करण्यात आली. यावेळी संगीता मोळवणे, अर्चना गौडा, कविका वाडीकर, ममता कुलकर्णी, पार्वती सातपुते, राणी डमडेरे, चंदाताई लवटे, दिपा शेटे, रेणूका अंबूलगे, छाया धनूरे, शामल चव्हाण आदी महिलांची प्रमुख उपस्थिती होती.



यावेळी उपस्थित महिलांना विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन वैशालीताई देशमुख यांनी दसजयाच्या निमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्या.

# अतिवृष्टीने शेती पिकाच....

**(पान १ वरुन) :** राज्यातील ८ जिल्ह्यातील ९ लाख ७५ हजार ५९ शेतकऱ्यांसाठी ९९७ कोटी ४ लाख ३६ हजार रुपयाची मदत जाहीर केली आहे. त्यात लातूर जिल्ह्यात झालेल्या पीक नुकसानीपोटी ३८४ कोटी १४ लाख ३८ हजार रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील रेणापूर तालुक्यातील ४४ हजार २३५ शेतकऱ्यांना ६० कोटी ८५ लाख ४१ हजार रुपयाची तर लातूर तालुक्यातील २७ हजार ४३१ शेतकऱ्यांना ४२ कोटी ७० लाख ८१ हजार रुपयाची मदत राज्यातील महायुती शासनाने मंजूर केली आहे. सदरील निधी मंजूर व्हावा यासाठी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी सर्व संबंधिताकडे पाठपुरावा केल्याबद्दल व निधी मिळवून दिल्याबद्दल लातूर ग्रामीण मतदार संघातील भाजपाचे लोकप्रतिनिधी पदाधिकारी यांच्यासह शेतकऱ्यांनी आभार व्यक्त केले आहेत.

# तरुणाच्या अवयव प्रत्यारोपणासाठी आर्थिक मदतीचे आवाहन

रवींद्र मालुसरे : पोलादपूर तालुक्यातील देवळे गावातील मुंबई निवासी सखाराम एकनाथ केसरकर हे गेल्या दोन वर्षापासून लिव्हरचे आजाराने ग्रस्त आहेत. सध्या ते जसलोक हॉस्पिटलमध्ये ऍडमिट आहेत. दोन वर्षापासून घरातील सर्व जे काही होते ते उपचारासाठी खर्च झाले. सध्या त्यांचा उहीपळल डर्ळीशी उळीशरीश आजार बळावला असल्याने ताडीने लिव्हर प्रत्यारोपण करणे आवश्यक आहे. त्यासाठी वीस लाख रुपये खर्च अपेक्षित आहे. एवढा मोठा खर्च करणे त्या कुटूंबाला शक्य नाही. म्हणून यासाठी दानशूर नागरिकांना आर्थिक मदतीची विनंती करण्यात येत आहे. सखाराम केसरकर हे विवाहित असून त्यांचे वय ४० असून मुलगा १४ आणि मुलगी १३ वर्षे अशी आहेत. दानशूरांनी पुढील बँकेच्या खात्यावर यथाशक्ती आर्थिक मदत करावी तसेच अधिक माहितीसाठी नारायण केसरकर ९८२०९९९४५० या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात येत आहे.

SVC Bank (Shamrao Vithhal Co-op Bank) Manisha sakharam kesarkar, -C No 300003000022458 IFC CODE SVCB0000089

**मराठी अभिजात..**

भाषा हो अभिजात
उत्सवचाले महाराष्ट्री
प्रतिक्षा येई फळाला
सिंहासनावर मराठी
समृध्द संपन्न असूनि
झगडा होता ललाटी
उगाचंच राज दरबारी
तिष्ठली सर्वांत शेवटी
आग्रहावाचून लावावी
मराठीत नक्की पाटी
सॉरी अन् थँक्यू शब्द
नको ते उर्फाटी ओठी
मराठी शिक्षण लाघवी
नको कायद्याची काठी
दगदग पुष्कळ झाली
कॉन्व्हेन्ट प्रवेशा साठी
मराठी सिनेमे झळको
मल्टीप्लेक्स मध्ये हट्टी
दर्जेदार सिनेमा मिळो
बदला मोजमाप पट्टी
गढूळल्या मना वरती
फिरली कायदा तुरटी
मराठी आपल्यासाठी
आपण मराठी साठी
अभिजात दर्जा प्राप्त
ज्ञानेश्र्वरे उघडलीताटी
सजल्या भाषां पंगती
संगती सन्माने मराठी

२

**कृष्णाबाई ..**
**(क-हाड )**

क–हाडी प्रितीसंगम
कोयना कृष्णा माई
दृश्य देखणे विहंगम
चित्त हरकूनि जाई
पवित्र करी परिसरा
ग्राम देवी कृष्णाबाई
उपकार तुझे अनंत
कशी होईलं उतराई
बाजीराव करकरेना
स्वप्नात दृष्टांत होई
क–हाड नगरीत या
वास्तव्याआली आई
रे पांढ–या पाषाणात
मुर्तीची सुबक घडाई
दशभुजा आदिशक्ती
राक्षसा करी लढाई
मोहकरूप सिंहारूढ
भाविका खेचूनि घेई
खिळून राहिली दृष्टी
कोमल कमल पाई
आधी निघते पालखी
नगर प्रदक्षिणा होई
जयकाराचे गजरात
महायात्रा फुलून जाई
पालखीत कृष्णामाई
आपण बनायचे भोई
येसूबाई यात्रा करुनि
उत्सवा सांगता होई

**-हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

# बाळंतपण ही एक समस्या?

पुर्वी माणसांना शेतामध्ये शारीरिक श्रमाची,किंवा भरपूर कष्टाची कामे करावी लागत होती. दळप,कांडप,काडणं,पाणी आणने.धुणी धुण्यासाठी नदी किंवा ओढ्यात जाणे. डोक्यावर ओझं घेऊन चालत जाणे.पाटा वरवंट्यावरती मसाला वाटणे. परिस्थितीमुळे अंगातून घाम जाईपर्यंत श्रमाची कामे केल्याशिवाय दुसरा पर्याय त्यांच्या समोर नव्हता त्यामुळे नैसर्गिक रीत्या रोगप्रतिकारशक्ती निर्माण होत होती.शेतामध्ये रासायनिक खतांचा आणि औषधांचा वापर केला जात नव्हता.सेंद्रीय खतांचा वापर केला जात होता.अन्नधान्यामध्ये भरपूर प्रमाणात जीवनसत्व मिळत असल्याने माणसं सहजासहजी आजारांना बळी पडत नव्हती.घरच जेवण जेवायची सवयी होत्या.बाहेरच्या जेवणाची सवय नव्हती.श्रम करायची सवय असल्याने खाईल ते पचवायचं.बसेल तेथे गाढ झोप लागायची.आयुर्वेदीक औषधांचा वापर करीत होती. रासायनिक औषधांचा वापर केला जात नव्हता.कोणत्याही प्रकारच्या सुख सुविधा उपलब्ध नव्हत्या.जाण्या येण्यासाठी दळण वळणाच्या सोयीधा नव्हत्या.लाइटची सोय नव्हती.बैलगाडी किंवा कावड मधूनच औषध उपचारासाठी पेसेंटला दर्याखोर्यातून,नदी नाल्यातून जावं लागतं होतं. वाहनांची सोय नव्हती.दवाखाने,आणि डॉक्टरांची संख्या अंत्यंत कमी असल्याने डॉ.उपलब्ध नव्हते. त्यामुळे म्हणावी तशी पेसेंटना सेवा मिळत नव्हती. विविध प्रकारच्या तपासण्या किंवा चाचण्या करण्यासाठी प्रयोग शाळा,उपकरणे,यंत्रसामुग्री.साधन सामुग्री उपलब्ध नव्हती.वैज्ञानिक प्रगती झालेली नव्हती.तरी देखील त्यावेळी सरासरी सर्व महिला सुरळीतपणे नैसर्गिकरीत्याच बाळंत होऊन बाळ आणि बाळंतीण सुखरुप असायची. बर्याच प्रमाणात गाव घरीच बाळंतपण व्हायची.त्यामुळे आर्थिक खर्चाचा बोझा सर्व सामान्यांवर जास्त पडत नव्हता. त्यामुळे कुटुंबावरती आर्थिक दृष्ट्या ताणतणाव वाढत नव्हता.त्यावेळी माणसातली माणूसकी जीवंत होती. एकमेकांच्या प्रसंगी माणसं एकमेकांच्या मदतीला निस्वार्थीपणे धाऊन यायची.सध्या सर्वच क्षेत्रात वैज्ञानिक प्रगती झालेली असल्याने सर्व सामान्य माणसाचे राहणीमान.उंचावलेले आहे.सु:ख सोयीधा उपलब्ध झाल्याने माणूस आळशी बणत चालला आहे.कोणालाही शारिरीक श्रम करायला नको आहे. अंगातला घाम निघून जाईपर्यंत श्रमाची कामे करण्याची मानसिकता सध्या नसल्याने रोग प्रतिकारशक्ती कमी होत चालली असल्याने.शरीर दुबळे बणून आजारांना सहजपणे बळी पडत आहेत.जेवण पचत नाही गोळी,झोप येत नाही गोळी,चालता,बसता,उठता येत नाही गोळी.सतत रासायनिक खतांचा आणि औषधांचा अति वापर केल्यामुळे अन्न धान्यातील जीवनसत्व कमी होत चालली आहे. तसेच आताच्या पिढीला घरच्या जेवणापेक्षा बाहेरील हॉटेलचे भेसळ युक्त खाण्याच्या सवयीचे प्रमाण दिवसेंनदिवस वाढत चालले आहे.जिभेच्या चवी बदलत जाऊन चैनिप्रवृती वाढत चालली आहे.माणसांनी सुख म्हणजे काय? हेच समजून घेतलेलं नाही.सर्व क्षेत्रात संशोधन करून विविध साधनांचा व उपकरणांचा शोध लावल्यामुळे वेगवेगळ्या प्रकारची उपकरणांची निर्मिती केलेली आहे.विविध प्रकारच्या तपासण्या करण्यासाठी प्रयोग शाळा आणि यंत्रसामुग्री सध्या उपलब्ध आहेत. दळणवळणाच्या सुविधा उपलब्ध झाल्याने सर्व सामान्य जनतेचे आयुष्य मान वाढले आहे.

उच्च शिक्षित डॉक्टरांची संख्या आणि दवाखान्यांची संख्या भरपूर प्रमाणात वाढलेली आहे. तरी देखील पुर्वी प्रमाणे नैसर्गिकरित्या सरासरी बाळंतपण होत नाहीत.क्वचितच अपवाद म्हणून कुठेतरी एखादी. महीला चुकूनच नैसर्गिकरित्या बाळंतपण होत ती ही कुठे तरी शासकीय दवाखान्यात झालेली असल्याचे अपवाद म्हणून पहावयास मिळते आहे.प्रत्येक डॉक्टरांचा लॅबोरेटरी वाल्यांशी आणि औषध दूकानदाराशी हात मिळणी किंवा संगनमत करून सर्व सामान्य माणसांची आर्थिक दृष्ट्या लूट करीत असल्याची दाट शंका वाटते. बाळंतपणासाठी दवाखान्यात दाखल केल्यानंतर प्रथम प्रामुख्याने त्या पेसेंटची आर्थिक परिस्थितीची संपूर्ण माहिती घेतली जाते.प्राथमिक तपासणी किंवा चाचण्या केल्यानंतर हिमोग्लोबीन, किंवा कॅल्शियम किंवा तांबड्या,पांढर्या पेशी कमी असल्याचेही कारण पुढे केले जाते.दवाखान्यात सर्वत्र प्रामुख्याने तीन कारणे सांगितली जातात.१) पीसवीत पाणी फार कमी आहे.२) बाळाच्या गळ्याभोवती नाळ गुंडाळलेली आहे ३)बाळांने पिसवीतच संडास केलेलं आहे.४) बाळ आणि बाळंतीणीच्या जीविताला धोका आहे.

अशी अनेक कारणे नातेवाईकांना सांगितली जातात.जिविताला धोका असल्याचे कारण पुढे केले जाते.तेंव्हा ताबडतोब शस्त्रक्रिया करावी लागते. हे ऐकून नातेवाईक पुर्ण पुणे घाबरून जातात जीव वाचवण्यासाठी शस्त्रक्रियेचा निर्णय घ्यावा लागतो. आज सरासरी अंदाजे खर्च ५०,००० ते ६०,००० येतो आहे.तो खर्च सर्व सामान्य शेतकऱ्यांना किंवा मोलमजुरी करणाऱ्यांना परवडत नाही.त्यामुळे गरजेसाठी जमिनीवरती कर्ज किंवा खाजगी सहकारी पतसंस्थेतून कर्ज किंवा खाजगी सावकाराकडून कर्ज घेऊन दवाखान्याचे बील भरावे लागते.

राम गणेश गडकरी यांनी 'भावबंध' नाटकात लिहिले आहे.गरजवंताला अक्कल आणि लाज नसते. ते खरंच आहे.(आळस,अज्ञान,अंधश्रद्धा हे तीन माणसाचे खरे शत्रू आहेत.)

पुर्वी कोणत्याही सुविधा उपलब्ध नव्हत्या सर्व सामान्य महिला नैसर्गिकरित्या सुरळीतपणे बाळंतीण होत होत्या.तर मग आता का होत नाहीत? असा प्रश्र्न नेहमी मनात निर्माण होतो आहे.सध्या माणसाजवळची माणुसकी,व्यवहार,तत्त्व,विचार संपतं चाललेली आहे.जो तो कमी वेळात जास्त पैसा व संपत्ती मिळविण्यासाठी वेडा होऊन पैसांच्या मागे रात्रंदिवस धावत आहे.त्यामुळे सर्व सामान्य जनतेच्या आर्थिक शोषणाला जबाबदार कोण? उत्तर मिळते आपणचं!

जनतेची सेवा हीच खरी ईश्र्वर सेवा समजून मानवतेच्या दृष्टिकोनातून पेसेंटना सेवा देण्याचा विचार केला तर नक्कीचं परिस्थिती बदलू शकेल ! या साठी मानवता हाच खरा धर्म समजून! जनतेच्या सेवेतचं देव शोधला पाहिजे.जो तो पैसा आणि संपत्तीच्या मागे धावत आहे.त्यामुळे माणसातील माणूसपण संपतं जाऊन सैतान प्रवृती वाढीस लागली आहे.असे सर्वच क्षेत्रात अशी परिस्थिती पाहावयास मिळत आहे.प्रत्येक गोष्टीला एक मर्यादा असतात.त्या मर्यादा ओलांडण्याचा जो तो प्रयत्न करीत असल्याचे पहावयास मिळताहेत.तेंव्हा माणसातला माणूस जागा होणे गरजेचे आहे.

**आयु.देशमुख पी.आर.९९२११११९५५,**
**मु.चिंचणे.ता.चंदगड.जि.कोल्हापूर.**

# राशीभविष्य ०८ ऑक्टोबर २०२४

मेष : शुभ रंग :पांढरा, शुभ दिशा : पूर्व
सहकार्य व चांगले संबंध यामुळे आर्थिक लाभ होईल. अनेक दिवसापासून अडकलेले कामे पूर्णत्वाकडे जातील. रागावर नियंत्रण ठेवा.

वृषभ : शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:उत्तर
संपत्ती सबंधीत असलेल्या कामात केलेली धावपळ फायदेशीर राहील. आर्थिक लाभ वाढणार आहे. व्यापारात नवीन योजना बनविताल. बेजाबदारपणे कामे करू नका.

मिथुन:शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:उत्तर
दाम्पत्त्य जीवनात कटुता येईल. रचनात्मक कामाचे फळ चांगले मिळेल. भागीदारी व्यवसाय सुरू करण्याचा विचार कराल. तो कोणत्याही परिचित व्यक्तीच्या मदतीने करा.

कर्क : शुभ रंग:लाल, शुभ दिशा:उत्तर
आपल्या प्रयत्नामुळे आपली स्थिती मजबूत कराल. कौटुंबिक सामजस्य राहील. आर्थिक फायदा होईल. मोठेपणा दाखवू नका. शुभकार्यात भाग घ्याल.

सिंह : शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:पूर्व
मागील काही दिवसापासून अपूर्ण राहिलेले कामे पूर्ण होतील. आपल्या प्रयत्नामुळे घरगुती वाद मिटणार आहे. व्यापारात उन्नती होईल. आरोग्याकडे लक्ष द्या.

कन्या : शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा: पश्चिम
मुलांच्या भविष्याची चिंता राहील. वडिलांच्या मार्गदर्शनाने व्यवसायातील अडचणी दूर होईल. आर्थिक गुंतवणुकीत वाढ होईल. आपल्या अधिकाराचा किंवा कार्यक्षेत्राचा विस्तार होईल.

तुळ : शुभ रंग:निळा, शुभ दिशा: उत्तर
आपला प्रभाव वाढल्याने शत्रू परेशान होतील. सर्व कामे वेळेत पूर्ण होतील. वाचनाची गोडी वाढणार आहे. मितभाषी व्हा नाहीतर अडचणींचा सामना करावा लागेल.

वृश्चिक :शुभ रंग: जांभळा, शुभ दिशा:पश्चिम
आपल्या बुद्धीमत्तेची व दुरदर्शीपणाची समाजात स्तुती होईल. कार्यक्षेत्राचा विस्तार होईल. कौटुंबिक सुख मिळेल. भोग विलासी प्रवृत्तीत वाढ होईल. आर्थिक देण्याघेण्याच्या व्यवहारात सावधानी बाळगा.

धनु: शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: पूर्व
नोकरीत मनासारखी बदली किंवा पदोन्नती मिळण्याचे योग आहेत. स्थावर मालमत्तेपासून फायदा मिळेल. दुसऱ्याची टिंगल करू नका. प्रयत्न केल्यास अडकलेला पैसा मिळू शकतो.

मकर: शुभ रंग:काळा,शुभ दिशा: पश्चिम
कौटुंबिक तणाव वाढणार आहे त्यामुळे अजिविकामध्ये अडचणी येतील. अनोळखी व्यक्तीवर विश्वास ठेवू नका ते आपल्याला अडचणीत आणतील. प्रवास करू नका. परमेश्वराविषयी विश्वास वाढणार आहे.

कुंभ : शुभ रंग:केसरी, शुभ दिशा : उत्तर
दूरदर्शीपणा व बुद्धीच्या जोरावर अडचणींचा सामना कराल. आपल्या कामाची समाजात, घरात स्तुती होईल. व्यापारात नवीन संबंध प्रस्तापित होतील. वहान चालवितांना सावधानी बाळगा.

मीन : शुभ रंग :लाल,शुभ दिशा:पूर्व
शत्रू आपल्या कामात बाधा आणण्याचा प्रयत्न करतील. मुलांच्या भविष्याची काळजी राहील. आर्थिक कामकाज मध्यम राहील. नवीन सबंध सहजासहजी बनतील.

# आंबिया बहार फळ पीक विमा योजना शेतकऱ्यानी लाभ घ्यावा

पुनर्रचित हवामान आधारित 'फळ पीक विमा योजना' आंबिया बहार सन २०२४–२५ मध्ये डाळिंब, संत्रा, मोसंबी, काजू, केळी, द्राक्ष, आंबा, पपई व स्टॉबेरी या ९ फळपिकांसाठी ३० जिल्ह्यामध्ये राबविण्यात येत आहे. या योजनेचा जास्तीत–जास्त शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, यासाठी या योजनेची माहिती देणारा हा लेख

बिया बहार फळ पीक विमा योजनेत कर्जदार तसेच बिगर कर्जदार शेतकऱ्यांचा अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांसाठी सहभाग ऐच्छिक आहे. योजनेत सहभागी होणेबाबत अथवा न होणेबाबत घोषणापत्र ज्या बँकेमध्ये पिककर्ज खाते किसान क्रेडिट कार्ड खाते आहे तिथे जमा करणे आवश्यक आहे. कर्जदार शेतकऱ्यांनी योजनेत सहभागी न होण्याबाबत घोषणापत्र योजनेत सहभागी होण्याच्या अंतिम मुदतीच्या ७ दिवस अगोदर बँकेला देणे आवश्यक आहे. जेणेकरुन बँक विमा हप्ता परस्पर कपात करणार नाही. तसेच कर्जदार शेतकऱ्यांनी योजनेत सहभागी होण्यासाठी कर्ज घेतलेल्या अधिसूचित फळपिकांकरिता विहित नमुन्यातील घोषणापत्र संबंधित बँकेत सादर करणे आवश्यक राहिल. जे कर्जदार शेतकरी विहित मुदतीत सहभागी न होण्यासाठी बँकांना कळविणार नाहीत, असे शेतकरी योजनेत सहभागी आहेत असे गृहित धरण्यात येईल व या शेतकऱ्यांचा विमा हप्ता विहित पद्धतीने कर्ज खात्यातून वजा करण्यात येईल.

अधिसूचित क्षेत्रात अधिसूचित फळपिके घेणारे या योजनेत भाग घेण्यास पात्र आहेत. भाडेपट्टीने शेती करणाऱ्या शेतकऱ्यांस नोंदणीकृत भाडेकरार अनिवार्य आहे. या योजनेत राज्यात प्रति शेतकरी सहभागासाठी कोकण विभागाकरीता एका फळपीकाखालील कमीत कमी उत्पादनक्षम क्षेत्र १० गुंठे (०.१० हे) आणि उर्वरित विभागाकरीता कमीत कमी उत्पादनक्षम क्षेत्र २० गुंठे (०.२० हे.) अशी मर्यादा राहील. एका शेतकऱ्यास अधिसूचित फळपिकासाठी मृग व आंबिया बहार मिळूण जास्तीत जास्त ४ हेक्टर क्षेत्र मर्यादेपर्यंत विमा नोंदणी करण्याची मुभा आहे. केवळ उत्पादनक्षम फळबागांनाच विमा संरक्षणाचे कवच लागू राहणार आहे. त्यासाठी फळपिकांचे उत्पादनक्षम वय पुढीलप्रमाणे राहील. आंबा, चिकू, काजू फळ पिकासाठी उत्पादनक्षम वय ५ वर्षे, लिंबू फळ पिकासाठी उत्पादनक्षम वय ४ वर्षे, संत्रा, मोसंबी, पेरू, सीताफळ फळ पिकासाठी उत्पादनक्षम वय ३ वर्षे, डाळिंब, द्राक्ष फळ पिकासाठी उत्पादनक्षम वय २ वर्षे, केळी, पपई, स्ट्रॉबेरी पिकासाठी उत्पादनक्षम वय नाही. त्यापेक्षा कमी वयाच्या फळबागा लागवडीस विमा संरक्षणाची नोंद झाल्याचे पडताळणीत निदर्शनास आल्यास विमा संरक्षण संपुष्टात येईल.

ही योजना पुढीलप्रमाणे कंपन्यांच्या माध्यमातून अधिसूचित जिल्ह्यात राबविण्यात येते. जळगाव, नांदेड, हिंगोली, यवतमाळ, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, वर्धा आणि रत्नागिरी जिल्ह्यासाठी भारतीय कृषी




विमा कंपनी लि., जालना जिल्ह्यासाठी फ्युचर जनरली इंडिया इन्शुरन्स कंपनी लि., छत्रपती संभाजीनगर, धाराशिव ,अमरावती,अकोला, नागपूर, परभणी, रायगड, नंदुरबार जिल्ह्यासाठी युनिवर्सल सोम्पो जनरल इन्शुरन्स कंपनी लि. आणि ठाणे, पालघर, धुळे, पुणे, सांगली, लातूर, बुलढाणा, नाशिक, अहमदनगर, सोलापूर, सातारा, बीड, आणि वाशिम जिल्ह्यासाठी बजाज अलियांन्झ जनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड या कंपन्यांच्या माध्यमातून अधिसूचित जिल्ह्यात राबविण्यात येणार आहे.

आंबिया बहार सन २०२४–२५ मध्ये फळपिक द्राक्ष पिकासाठी विमा संरक्षित रक्कम ३ लाख ८० हजार आहे. गारपीट या हवामान धोक्याकरता विमा संरक्षित रक्कम १ लाख २७ हजार असून शेतकऱ्यांनी योजनेमध्ये सहभाग घेण्याचा अंतिम दिनांक १५ ऑक्टोबर, २०२४ असा आहे

मोसंबी पिकासाठी विमा संरक्षित रक्कम एक लाख आहे. गारपीट या हवामान धोक्याकरता विमा संरक्षित रक्कम ३३ हजार आहे. केळी पिकासाठी विमा संरक्षित रक्कम एक लाख ७० हजार आहे. गारपीट या हवामान धोक्याकरता विमा संरक्षित रक्कम ५७ हजार आहे. पपई पिकासाठी विमा संरक्षित रक्कम ४० हजार आहे. गारपीट या हवामान धोक्याकरता विमा संरक्षित रक्कम १३ हजार आहे. शेतकऱ्यांनी योजनेमध्ये सहभाग घेण्याचा अंतिम दिनांक ३१ ऑक्टोबर २०२४ असा आहे.

संत्रा पिकासाठी विमा संरक्षित रक्कम एक लाख आहे. गारपीट या हवामान धोक्याकरता विमा संरक्षित रक्कम ३३ हजार आहे. काजू पिकासाठी विमा संरक्षित रक्कम एक लाख २० हजार आहे. गारपीट या हवामान धोक्याकरता विमा संरक्षित रक्कम ४० हजार आहे. आंबा (कोकण) पिकासाठी विमा संरक्षित रक्कम एक लाख ७० हजार आहे. गारपीट या हवामान धोक्याकरता विमा संरक्षित रक्कम ५७ हजार आहे. शेतकऱ्यांनी योजनेमध्ये सहभाग घेण्याचा अंतिम दिनांक ३० नोव्हेंबर २०२४ असा आहे.

आंबा (इतर जिल्हे) पिकासाठी विमा संरक्षित रक्कम एक लाख ७० हजार आहे.गारपीट या हवामान धोक्याकरता विमा संरक्षित रक्कम ५७ हजार आहे. शेतकऱ्यांनी योजनेमध्ये सहभाग घेण्याचा अंतिम दिनांक ३१ डिसेंबर २०२४ असा आहे.

स्ट्रॉबेरी पिकासाठी विमा संरक्षित रक्कम दोन लाख ४० हजार आहे. गारपीट या हवामान धोक्याकरता विमा संरक्षित रक्कम ८० हजार आहे. शेतकऱ्यांनी योजनेमध्ये सहभाग घेण्याचा अंतिम दिनांक १४ ऑक्टोबर २०२४ असा आहे.डाळिंब पिकासाठी विमा संरक्षित रक्कम एक लाख ६० हजार आहे. गारपीट या हवामान धोक्याकरता विमा संरक्षित रक्कम ५३ हजार आहे. शेतकऱ्यांनी योजनेमध्ये सहभाग घेण्याचा अंतिम दिनांक १४ जानेवारी २०२५ असा आहे.योजनेत भाग घेण्यासाठी शेतकऱ्यांनी भरावयाचा विमा हप्ता सर्वसाधारण पणे विमा संरक्षित रकमेच्या ५% असतो. मात्र काही जिल्ह्यात तो जास्त असू शकतो .

आंबिया बहार सन २०२४–२५ या वर्षासाठी अधिसूचित फळ पिके, समाविष्ट हवामान धोके व विमा संरक्षण कालावधी निश्चित करण्यात आला आहे. अवेळी पाऊस, कमी जास्त तापमान, वेगाचे वारे, गारपीट इत्यादी निर्धारीत केलेले हवामान धोके लागू झाल्यास विमाधारक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई विमा कंपनी मार्फत देय होणार आहे.

योजनेत सहभाग करीता राष्ट्रीय पिक विमा पोर्टल (https://pmfby.gov.in) या संकेतस्थळास भेट द्यावी. तसेच आंबिया बहारात सहभागी झालेल्या शेतकऱ्यांसाठी गारपीट (अवव`प उेंशी) या हवामान धोक्यासाठी राज्य शासनामार्फत विमा संरक्षण उपलब्ध करुन देण्यात आलेले असुन गारपीट या हवामान धोक्यासाठी सहभाग ऐच्छिक राहील व याकरीता अतिरिक्त विमा हप्ता देय आहे. ज्या शेतकऱ्यांना गारपीट या हवामान धोक्याकरिता सहभाग नोंदवावयाचा असेल अशा शेतकऱ्यांनी त्यांचा नियमीत व अतिरिक्त विमा हप्ता हा बँकांमार्फतच भरणे आवश्यक आहे.

शेतकऱ्यांनी अधिसुचित फळपिकांच्या हवामान धोक्यांची तसेच त्यांना भरावयाच्या विमा हप्त्याची माहिती करुन घेऊन विहित मुदतीमध्ये नजिकच्या ई–सेवा केंद्र किंवा बँक वित्तीय संस्था यांच्याशी संपर्क साधून सहभाग नोंदवावा. आंबिया बहारातील अधिसुचित योजनेच्या अधिक माहितीसाठी सबंधित विमा कंपनीचे तालुका कार्यालय किंवा कृषी विभागाच्या कार्यालयाशी संपर्क साधावा.

### विलास सहकारी साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक संजीव देसाई यांची 'दी इथेनॉल मॅन्यूफॅक्चरर्स असोशिएशन ऑफ इंडिया' या संस्थेच्या संचालक मंडळावर निवड

निवळी, ता. लातूर : विलास सहकारी साखर कारखाना लि. वैशालीनगर, निवळी, ता.जि.लातूर या कारखान्याचे कार्यकारी संचालक श्री.संजीव देसाई यांची 'दी इथेनॉल मॅन्यूफॅक्चरर्स असोशिएशन ऑफ इंडिया' या संस्थेच्या संचालक मंडळावर निवड करण्यात आलेली आहे. 'दी इथेनॉल मॅन्यूफॅक्चरर्स असोशिएशन ऑफ इंडिया' ही संस्था इथेनॉल उत्पादन करणाऱ्या राज्य व देश पातळीवरील प्रकल्पांचे प्रतिनिधीत्व करणारी संस्था असून दिनांक ०६ ऑक्टोबर २०२४ रोजी संस्थेची अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा पार पडली. सदरील सभेत नुतन संचालक मंडळाची निवड करण्यात आली असून संचालक मंडळावर विलास सहकारी साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक श्री.संजीव देसाई यांची निवड करण्यात आली आहे. तसेच नुतन संचालक मंडळावर माजी उपमुख्यमंत्री मा.श्री. विजयसिंह माहिते पाटील, माजी सहकार मंत्री मा.श्री. हर्षवर्धन पाटील, माजी सहकार मंत्री मा.श्री. जयप्रकाश दांडेगावकर यांचेसह इतर तज्ञ मान्यवरांची निवड करण्यात आलेली आहे. मांजरा परिवाराचे आधारवड मा.श्री.दिलीपरावजी देशमुख, माजी मंत्री व विलास कारखान्याचे संस्थापक मा.आ. श्री.अमित विलासरावजी देशमुख, लातूर ग्रामीणचे आमदार मा.धिरज विलासराव देशमुख व विलास कारखान्याच्या अध्यक्षा श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख यांनी श्री.संजीव देसाई यांच्या निवडीबद्दल हार्दिक अभिनंदन करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.तसेच कारखान्याचे व्हा. चेअरमन रविंद्र काळे, त्यांचे कौतूक होत आहे.

# इतिहासात आजचा दिवस ०८ ऑक्टोबर

अंतरराष्ट्रीय

१८९७ – जुलमी इंग्रजी अधिकारी रँड यांची हत्या करणे का अवश्यक ठरले, त्याचे विवेचन करणारी जबानी दामोदार चापेकर यांनी न्यायालयात दिली.
२००२ – बुसान येथील आशियाई स्पर्धेत बहादूरसिंग (गोळाफ`क) व के.एम. बरिनामोल (८०० मी. धाव) यांना सुवर्णपदक, माधुरीसिंगला रजतपदक, तर शक्तिसिंगला (गोळाफेक) कांस्यपदक, हेप्टॅथेलॉनमध्ये सोमाविश्वास हिला रजत तर जे.जे. शोभाला कांस्यपदक मिळाले.
२००४ – मॉस्कोत भारत महोत्सवाची सुरुवात. 'कभी खुशी कभी गम' उद्घाटनाच्या दिवशी दाखवण्यात आला.
२००६ – मध्य व्हियतनामध्ये मुलांना शाळेत घेऊन जाणारी एक नाव बुडाल्याने १९ मुलांचा मृत्यू झाला.

राष्ट्रीय

१९०५ – विलायती कापडाची पहिली जाहीर होळी.
१९८६ – कोकणात आढळणाऱ्या लाल विंचवाच्या दंशावर उपयुक्त लसीची हाफकिन इन्स्टिट्यूटद्वारा निर्मिती.
२००७ – विजेचा उच्चदाब अचानक वाढल्याने नागपूर येथील चंद्रमणीनगरातील जवळपास १०० घरांत टीव्हीचा स्फोट झाला.
२००७ – कोईम्बतूरच्या एका न्यायालयाने १९९८ च्या साखळी बॉम्बस्फोट प्रकरणात समाविष्ट असलेल्या ३५ जणांना ९ महिने ते ७ वर्षे कारावासाची शिक्षा ठोठावली.
२००७ – विक्रमांचा बादशाह सचिन तेंडुलकरने आपल्या खात्यात सर्वाधिक एकदिवसीय अर्धशतकांचा नवा विक्रम जोडला. सचिनने एकदिवसीय क्रिकेटमधील ८४ वे अर्धशतक पुर्ण केले.
२००७ – आंतरराष्ट्रीय कीर्तीचे संशोधक डॉ. अब्दुल बशीर यांना स्मृती प्रतिष्ठानच्या वतीने दिला जाणारा 'चंद्रपूर भूषण' पुरस्कार प्रदान करण्यात आला.
२००७ – नागालँडचा मोकोचुंग जिल्ह्यात राष्ट्रीय महामार्ग ६१ वर एक प्रवाशी बस खोल दरीत कोसळून १७ जण ठार झाले.

जन्म

१६५६ – एडमंड हॅले, धूमकेतूमुळे खगोलशास्त्रज्ञ.
१८३२ – अल्लाउद्दीन खाँ, सुप्रसिद्ध सरोदवादक.
१८९१ – शंकर वासुदेव किर्लोस्कर (शंवकि), 'किर्लोस्कर' मासिकाचे संस्थापक संपादक.
१९२६ – शंकर पाटील, विनोदी कथा व पटकथालेखक.

निधन

१८८८ – महादेव मोरेश्वर कुंटे, 'राजा शिवाजी' या महाकाव्याचे कवी.
१९३६ – मुन्शी प्रेमचंद, सुप्रसिद्ध लेखक.
१९६७ – क्लेमंट इटली, माजी ब्रिटीश पंतप्रधान.
१९७९ – जयप्रकाश नारायण, आणिबाणीविरुद्धच्या लढ्याचे नेतृत्त्व करणारे सर्वोदयी नेते.
२००८ – 'फैज–ए–आम' ट्रस्टचे अध्यक्ष पद्मविभूषण ज्युल्फिकार हुसेन.

### महात्मा बसवेश्वरमध्ये रासेयो तर्फे स्वच्छता ही सेवा अभियान संपन्न

लातूर : महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचालित महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील खट–उ, राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, समाजकार्य आणि क्रीडा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने स्वच्छता ही सेवा या अभिमान संपन्न झाले. युवक व क्रीडा मंत्रालय, नवी दिल्ली, राष्ट्रीय सेवा योजना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय कक्ष, मुंबई यांच्या निर्देशानुसार दि. १७ सप्टेंबर ते २ आक्टोबर २०२४ हा पंधरवाडा यावर्षी 'स्वच्छता ही सेवा' या अभियानाने राबविण्याचे सूचित करण्यात आले होते.

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर - ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी) RNI No.: - MAHMAR/2017/72894